सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२९ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## ट्रम्प-पुतिन भेटीपूर्वी झेलेन्स्कींचा इशारा; युक्रेनच्या प्रादेशिक अखंडतेवर कुठलीही तडजोड नाही

किव, ९ ऑगस्ट : युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी इशारा दिला की, युक्रेन आपली जमीन सोडणार नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियासोबतच्या शांतता करारात काही प्रदेशांची देवाणघेवाण समाविष्ट असू शकते या दाव्यानंतर त्यांचे हे विधान आले. ट्रम्प पुढील शुक्रवारी अलास्कामध्ये त्यांचे रशियन समकक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेणार आहेत. या बैठकीत युक्रेन युद्धावर चर्चा होणार आहे.

ट्रम्प-पुतिन भेटीबाबत झेलेन्स्की म्हणाले की, संविधानात समाविष्ट असलेल्या युक्रेनच्या प्रादेशिक अखंडतेवर कोणतीही तडजोड करता येणार नाही. कायमस्वरूपी शांततेसाठी होणाऱ्या चर्चेत युक्रेनचा आवाजही समाविष्ट केला पाहिजे. युक्रेन रशियाला त्याच्या कृतींसाठी कोणतेही बक्षीस देणार नाही. युक्रेनचे नागरिक रशियाला त्यांच्या भूमीवर कब्जा करू देणार नाहीत. झेलेन्स्की म्हणाले की, युक्रेनशिवाय कोणताही उपाय शांततेच्या विरोधात आहे. यातून काहीही साध्य होणार नाही. हे निर्जीव उपाय आहेत आणि ते कधीही काम करणार नाहीत. झेलेन्स्की म्हणाले की, त्यांनी ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांच्याशी बोलणे झाले आहे. त्यांनी सांगितले की, दोन्ही नेत्यांनी युक्रेनला खरोखरच कायमस्वरूपी शांततेची आवश्यकता आहे यावर सहमती दर्शविली. त्यांनी असेही म्हटले की, रशिया सर्वकाही अशा मागण्यांकडे नेऊ इच्छितो ज्या पूर्ण होऊ शकत नाहीत. युक्रेनियन राष्ट्राध्यक्षांनी असेही म्हटले की, ते युद्ध संपवण्यासाठी काम करत असलेल्या ब्रिटन, अमेरिका आणि सर्व भागीदार देशांच्या वचनबद्धतेचे कौतुक करतात.

# देशातील दुसरे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम बंगळुरूमध्ये उभारले जाणार

बंगळुरू: कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बंगळुरूमधील बोम्मासंद्राच्या सूर्या सिटीमध्ये एक भव्य नवीन क्रिकेट स्टेडियम बांधण्याची घोषणा केली आहे. या स्टेडियमची क्षमता ८० हजार प्रेक्षकांची असून, प्रेक्षक क्षमतेच्या बाबतीत हे देशातील दुसरे सर्वात मोठे स्टेडियम ठरेल. सध्या अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम हे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम आहे.

१,६५० कोटी रुपयांचा प्रकल्प

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १६५० कोटी रुपये खर्चून उभारला जाईल आणि त्याचा संपूर्ण खर्च कर्नाटक गृहनिर्माण



मंडळाकडून केला जाणार आहे. हे नवीन स्टेडियम सध्याच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमपासून सुमारे २२ किलोमीटर दूर आहे. नुकत्याच रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या (ठउइ) आयपीएल विजयाच्या सोहळ्यादरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगराचेंगरीनंतर हे स्टेडियम बांधण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे म्हटले जाते. या घटनेत ११ जणांना आपला जीव गमवावा लागला होता.

केवळ स्टेडियम नव्हे, क्रीडा संकुल

या प्रकल्पात केवळ क्रिकेट मैदानच नाही, तर अनेक आधुनिक सुविधा असणार आहेत. यामध्ये आठ इनडोअर आणि आठ आऊटडोअर क्रीडा सुविधा, एक अत्याधुनिक जिम, प्रशिक्षण केंद्र, स्विमिंग पूल, गेस्ट हाऊस, हॉस्टेल, हॉटेल आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांसाठी कन्व्हेन्शन हॉल यांचा समावेश आहे. हे स्टेडियम बंगळुरूमधील बीसीसीआयच्या नवीन राष्ट्रीय क्रिकेट अकादमीप्रमाणे विकसित होण्याची शक्यता आहे. यामुळे स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडूंनाही याचा मोठा फायदा होणार आहे.

## निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय: ३३४ राजकीय पक्षांची नोंदणी रद्द

नवी दिल्ली: देशातील निवडणूक प्रक्रिया अधिक स्वच्छ आणि पारदर्शक बनवण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आयोगाने ३३४ मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांची नोंदणी रद्द केली आहे. निवडणूक प्रणालीतील शुद्धीकरणाचा हा एक भाग असल्याचे आयोगाने म्हटले आहे.




निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, नोंदणीकृत राजकीय पक्षांनी प्रत्येक सहा वर्षांतून किमान एकदा तरी निवडणूक लढवणे अनिवार्य आहे. याशिवाय, पक्षाच्या कोणत्याही बदलाची माहिती आयोगाला देणेही बंधनकारक आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या पक्षांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

जून महिन्यात आयोगाने ३४५ पक्षांच्या नियमांचे पालन तपासण्यासाठी त्यांच्या चौकशीचे आदेश दिले होते. या तपासणीत ३३४ पक्षांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे समोर आले. उर्वरित काही प्रकरणे पुढील पडताळणीसाठी पाठवण्यात आली आहेत.

या कारवाईनंतर आता देशात एकूण ६ राष्ट्रीय, ६७ राज्यस्तरीय आणि २,५२० नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेले राजकीय पक्ष अस्तित्वात राहतील.

# पंतप्रधानांनी जागतिक संस्कृत दिनानिमित्त देशाला दिल्या शुभेच्छा

नवी दिल्ली, ९ ऑगस्ट : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज श्रावण पौर्णिमेनिमित्त, जागतिक संस्कृत दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संस्कृतला ज्ञान आणि अभिव्यक्तीचा शाश्वत स्रोत म्हणून वर्णन करताना, विविध क्षेत्रांमध्ये तिचा कायमस्वरूपी प्रभाव अधोरेखित केला.

पंतप्रधानांनी संस्कृत शिकण्यात, शिकवण्यात आणि लोकप्रिय करण्यात गुंतलेल्या जगभरातील विद्वान, विद्यार्थी आणि उत्साही लोकांच्या समर्पणाचे कौतुक केले. गेल्या दशकात, सरकारने संस्कृतचे शिक्षण आणि संशोधन मजबूत करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत, जसे की केंद्रीय संस्कृत विद्यापीठे स्थापन करणे, संस्कृत शिक्षण केंद्रे उघडणे, संस्कृत विद्वानांना अनुदान देणे आणि हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करण्यासाठी ज्ञान भारतम मिशन सुरू करणे यावर त्यांनी भर दिला.

एक्स वरील पोस्टच्या मालिकेत पंतप्रधानांनी लिहिले की, आज, श्रावण पौर्णिमेच्या निमित्ताने, आपण जागतिक संस्कृत दिन साजरा करत आहोत. संस्कृत हा ज्ञान आणि अभिव्यक्तीचा शाश्वत स्रोत आहे. त्याचा प्रभाव सर्व क्षेत्रात दिसून येतो. हा दिवस जगभरात संस्कृत शिकणाऱ्या आणि लोकप्रिय करणाऱ्या प्रत्येकाच्या प्रयत्नांचे कौतुक करण्याचा एक प्रसंग आहे. गेल्या दशकात, आपल्या सरकारने संस्कृत लोकप्रिय करण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत.

यामध्ये केंद्रीय संस्कृत विद्यापीठे, संस्कृत शिक्षण केंद्रे, संस्कृत विद्वानांना अनुदान आणि हस्तलिखितांच्या डिजिटायझेशनसाठी ज्ञान भारतम मिशनची स्थापना समाविष्ट आहे.

याचा असंख्य विद्यार्थी आणि संशोधकांना फायदा झाला आहे. त्यांनी आपले भाषण संस्कृतमध्येही लिहिले आणि ते म्हणाले, अद्य श्रावणपूर्णिमादिने वयं विश्वसंस्कृतदिवसम् आचरामः। संस्कृतभाषा ज्ञानस्य अभिव्यक्तेः च अनादिस्रोतः अस्ति। तस्याः प्रभावः विविधेषु क्षेत्रेषु द्रष्टुं शक्यते। समग्रे विश्वे प्रत्येकम् अपि जनः यः संस्कृतं पठितुं तस्य प्रचारं कर्तुं च प्रयतमानः अस्ति तस्य प्रशंसायै कश्चन अवसरः नाम एतत् दिनम्। गते दशके अस्माकं सर्वकारेण संस्कृतस्य प्रचाराय अनेके प्रयासाः कृताः सन्ति। तेषु त्रयाणां केन्द्रीयसंस्कृतविश्वविद्यालयानां स्थापनम्, संस्कृताध्ययनकेन्द्राणाम् आरम्भः, संस्कृतविद्वद्भ्यः अनुदानप्रदानम्, पाण्डुलिपीनां डिजिटल माध्यमे स्थापनाय ज्ञानभारतं मिशन् इत्यादीनि सन्ति। एतेन अगणिताः छात्राः शोधार्थिनः च लाभान्विताः जाताः।

## नांदेडमध्ये लवकरच धावणार शहर बस

नांदेड, ९ ऑगस्ट - नांदेड शहरातील अंतर्गत प्रवासासाठी शहर बस सेवा पुन्हा सुरू करण्याच्या अनुषंगाने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतली. या भेटीत सकारात्मक चर्चा झाल्याचे आ. बोंढारकर यांनी सांगितले असून लवकरच नांदेड शहरात पुन्हा एकदा सिटी बस धावेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नांदेड शहराचा वाढता विस्तार आणि प्रवाशांची संख्या लक्षात घेता शहरात शहर बस सेवा असणे अत्यावश्यक झाले आहे. खाजगी आटोतून प्रवास करताना प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो आहे. शिवाय रिक्षा चालकांची मनमानी आणि उद्धटपण यामुळे होणारे वाद लक्षात घेता नांदेडमध्ये शहर बस सेवा सुरू व्हावी यासाठी आ. बोंढारकर यांचे प्रयत्न सुरू आहेत.

# ‘भारताने पाकिस्तानची पाच लढाऊ विमानं पाडली’

बंगळुरू : ऑपरेशन सिंदूर कसे करायचे यासाठी मोदी सरकारने सैन्यावर कोणतेही बंधन घातले नव्हते. सैन्याच्या सर्व दलांनी परस्पर समन्वय राखून स्वतःचे प्राधान्यक्रम निश्चित केले आणि शत्रूवर हल्ल्याची एक प्रभावी योजना आखली. ही योजना कशी असावी किंवा कशी असू नये अशा स्वरुपाचे कोणतेही बंधन सरकारने सैन्यावर घातले नव्हते. हल्ला कधी सुरू करावा आणि कधी थांबवावा याबाबतचे निर्णय सैन्याने घेतले; असे भारताचे हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल एपी सिंग म्हणाले. भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानचे कंबरडे कसे मोडले याची माहिती त्यांनी दिली.

भारताच्या सैन्य दलांनी परस्पर समन्वय राखून एक प्रभावी योजना राबवली आणि ऑपरेशन सिंदूर अंतर्गत ३०० किमी. लांबून अचूक हल्ला केला. या हल्ल्याद्वारे भारताने पाकिस्तानची



पाच लढाऊ विमानं आणि एक एअरबॉर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल अशी एकूण सहा विमानं नष्ट केली. पाकिस्तानच्या नष्ट झालेल्या विमानांमध्ये एफ १६ विमानांचाही समावेश होता, असा गौप्यस्फोट एअर चीफ मार्शल एपी सिंग यांनी केला. भारताने कसा एअर स्ट्राईक केला आणि पाकिस्तानमध्ये काय वाताहात झाली याची सविस्तर माहिती त्यांनी एका सादरीकरणाद्वारे दिली. पाकिस्तानमधील अतिरेक्यांचे तळ नष्ट केल्याचेही एअर चीफ मार्शल म्हणाले.

एअर चीफ मार्शल एलएम कात्रे व्याख्यानात बोलताना एपी सिंग यांनी एस - ४०० क्षेपणास्त्राच्या हल्ल्यात पाकिस्तानची विमानं नष्ट झाल्याचे सांगितले. भारतीय हवाई दलाच्या एअर डिफेन्स सरफेस-टू-एअर मिसाईल सिस्टिमने अर्थात एस - ४०० ने पाकिस्तानची पाच लढाऊ विमानं आणि एक एअरबॉर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल अशी एकूण सहा विमानं नष्ट केली. भारताच्या सर्व क्षेपणास्त्रांनी त्यांच्या लक्ष्यावर हल्ला केला, ज्यामध्ये रावळपिंडी येथील पाकिस्तानी लष्कराच्या जनरल मुख्यालयाजवळील नूर खान एअरबेसला टार्गेट करण्यात आलं होतं. भारताने सलग दुसऱ्या दिवशी स्ट्राइक करुन पाकिस्तानचे अतिरेकी तळ नष्ट केले.

भारताने ९० मिनिटांचया एअर स्ट्राईकद्वारे नूर खान एअरबेस, शोरकोटमधील रफीकी एअरबेस, पंजाबमधील मुरीद एअरबेस, सिंधमधील सुक्कुर एअरबेस, सियालकोट एअरबेस, सरगोधा एअरबेस, स्कार्दू एअरबेस, कराचीजवळील भोलारी एअरबेस, जेकबाबाद एअरबेस आणि पसरूर एअरस्ट्रिपवर हल्ला केला, असे एअर चीफ मार्शल म्हणाले.

## नाशकात उपअभियंता व कनिष्ठ अभियंत्यास दोन लाखांची लाच घेताना अटक

नाशिक, ९ ऑगस्ट : केलेल्या कामाचे बक्षीस स्वरूपात, तसेच सध्याच्या प्रलंबित कामाचे बिल मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता व कनिष्ठ अभियंत्यास २ लाख १६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी, की तक्रारदार हे शासकीय कॉन्ट्रॅक्टर असून, त्यांनी सावरपाडा (ता. दिंडोरी) येथे जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शिवारपाडा येथे यापूर्वी केलेल्या कामाचे बक्षीसस्वरूपात, तसेच सध्याच्या प्रलंबित असलेल्या कामाचे बिल मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात जिल्हा परिषद, ग्रामपंचायत पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता योगेश नारायण घारे (वय ४४, रा. तिरुमाला भूमिका, काठे गल्ली, द्वारका, नाशिक) व दिंडोरी पंचायत समितीचे पाणीपुरवठा विभागाचे कनिष्ठ अभियंता मनीष कमलाकर जाधव (२९, रा. कुंजविहार सोसायटी, हिरावाडी, पंचवटी) यांनी तक्रारदारांकडे २ लाख १६ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. ही रक्कम दि. ८ ऑगस्ट रोजी दिंडोरी पंचायत समितीच्या कार्यालयात ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागात स्वीकारताना योगेश घारे व मनीष जाधव यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. या दोघांविरुद्ध दिंडोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षीय बालकाचा मृत्यू

नाशिक, ९ ऑगस्ट - शहरातील वडनेर दुमाला गावात शुक्रवारी रात्री आयुष किरण भगत या चार वर्षाच्या बालकावर बिबट्याने हल्ला करून त्याला जवळ असलेल्या एका शेतात ओढत नेले होते. त्यानंतर गावातील नागरिकांनी तसेच वन विभागाच्या अधिकारी कर्मचारी व नातेवाईकांनी तब्बल साडेतीन तास शोध घेतल्यानंतर त्याचा मृतदेह रात्री बारा वाजेच्या सुमारास गावा लगत ऊसाच्या मळ्यात आढळून आला.



गेल्या दोन ते चार दिवसापासून नाशिकरोडच्या जय भवानी रोड येथे बिबट्याचा वावर सुरू आहे. या घटना ताज्या असतानाच वडनेर दुमाला येथे आयुष किरण भगत या चार वर्षाच्या बालकाला बिबट्याने घराबाहेर ओट्यावरून ओढत नेले व त्याच्यावर हल्ला करून जवळच असलेल्या शेतात नेले. या घटनेनंतर नातेवाईक व आजूबाजूच्या नागरिकांना शोधमोहीम सुरू करून वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना माहिती दिली. यानंतर तातडीने वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाली व त्यांनी ड्रोनच्या साह्याने व्यापक शोधमोहीम राबवली.

या मोहिमेमध्ये उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयंत शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे श्वान पथक , गुगल श्वान, स्थानिक लोकप्रतिनिधी, गावकरी युवक, आणि वनविभागाचे अधिकारी सक्रिय सहभागी होते. या शोध मोहिमेदरम्यान घराच्या मागच्या बाजूला असलेल्या दाराजवळ रक्ताचे डाग व थोड्या अंतरावर मुलाची पॅन्ट आढळून आली होती. मात्र दुर्दैवाने आयुषचा मृतदेह हाती लागल्याने परिसरात प्रचंड हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, आयुषचे वडील किरण भगत हे खाजगी कंपनीत काम करत असून, त्यांना एक मुलगी आणि आयुष हा मुलगा होता. मात्र, रक्षाबंधनाच्या पूर्व संध्येलाच आयुषचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसर दुःख व्यक्त केले जात आहे. या दुर्दैवी घटनेने वडनेर दुमाला परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## धान्यापासून दारु बनवण्याला राज्यात ’हिरवा’ कंदील, राज्याच्या तिजोरीत महसूल वाढणार!

मुंबई : महसूल वाढवण्याच्या प्रयत्नात, महाराष्ट्र सरकारने धान्य-आधारित दारूच्या उत्पादनाला परवानगी दिली आहे. बंद आणि कमी वापरात असलेल्या पिण्यायोग्य दारू परवानाधारक (झङ ङ) युनिट्सना पूर्ण क्षमतेने चालवण्याची परवानगी देऊन त्यांना पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवारी जारी केलेल्या सरकारी आदेशानुसार, या निर्णयामुळे सुमारे ३,००० कोटी रुप यांचा अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षा आहे. २००७ मध्ये, काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने धान्यावर आधारित डिस्टिलरीज स्थापन करण्याची योजना सुरू केली होती, परंतु कार्यकर्त्यांच्या आक्षेपानंतर आणि २०१० मध्ये मुंबई उच्च



न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर ती रद्द करण्यात आली. या आदेशात महाराष्ट्र मेड लिकर (चचङ) चा उल्लेख आहे, जो इंडियन मेड लिकर (खचङ) आ णि इंडियन मेड फॉरेन लिकर (खचऋङ) सोबत एक नवीन श्रेणी आहे, जो राज्यात उत्पादित होणारा एक विशेष ब्रँड असेल.

ऑर्डरनुसार, धान्यांपासून बनवलेल्या एमएमएलची किंमत १८० मिलीसाठी १४८ रुपये असेल आणि त्यातील अल्कोहोलची ताकद आकारमानाने ४२.८ टक्के असेल असे सांगण्यात आले आहे. दे शी दारू आणि आयएमएफएलमधील किमतीतील तफावत भरून काढणे हे या आदेशात म्हटले गेले आहे. ब्रँड इतर कोणत्याही राज्यात किंवा देशी दारू,आयएमएल,बिअर, वाइन सारख्या इतर मद्य श्रेणींमध्ये तयार केला जाऊ शकत नाही. एमएमएलचे उत्पादन करणाऱ्या पीएलएल परवानाधारकांचे मुख्य कार्यालय महाराष्ट्रात असणे आवश्यक आहे ही अट या आदेशात आहे.

राज्यातील ७० पीएलएल युनिटपैकी २२ बंद आहेत आणि १६ फक्त किरकोळ विक्रेते म्हणून काम करतात, तर उर्वरित ३२ युनिट दारूचे उत्पादन करतात, त्यापैकी १० युनिट महाराष्ट्रात आयएम एफएलच्या ७० टक्के उत्पादन करतात. राज्यात धान्यावर आधारित दारूला प्रोत्साहन देण्याचा हा पहिलाच प्रयत्न नाही.धान्य अल्कोहोल, ज्याला बहुतेकदा धान्य अल्कोहोल किंवा तटस्थ स्पिरीट म्हणून संबोधले जाते, हे एक उच्च-प्रूफ स्पिरीट आहे जे कॉर्न, गहू किंवा बार्ली सारख्या धान्यांना आंबवून आणि डिस्टिलिंग करून बनवले जाते. हे एक रंगहीन, ज्वलनशील द्रव आहे ज्यामध्ये उच्च अल्कोहोल सामग्री असते, सामान्यतः सुमारे ९५% -इत (१९० प्रूफ). धान्य अल्कोहोलचा वापर व्होडका, जिन आणि काही प्रकारचे व्हिस्की सारख्या इतर अल्कोहोलिक पेये तयार करण्यासाठी आधार म्हणून केला जातो आणि ते सॉल्व्हेंट म्हणून देखील वापरले जाऊ शकते.

## टॅरिफ प्रकरण: देशात सर्वांनी सरकारसोबत उभं राहावं - शरद पवार

### मतदार यादी प्रकरणी केले राहुल गांधींचे समर्थन

नागपूर, ०९ ऑगस्ट : अमेरिनेने भारतावर लावलेल्या ५० टक्के टॅरिफ प्रकरणी देशवासियांनी एकत्र येऊन देशाच्या हिताचे रक्षण करावे. तसेच सर्वांनी याप्रकरणी सरकारच्या पाठिशी उभे रहावे असे आवाहन शरद पवार यांनी केले. नागपूरच्या प्रेसक्लबमध्ये आयोजित पत्रकारांशी वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी पवार म्हणाले की, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प टैरिफ लावून भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. या मुद्यावर देशवासीयांनी सरकारला सहकार्य करून भारताच्या हिताचे रक्षण करायला हवे. सध्याच्या काळात कूटनीती अपयशी ठरली असे म्हणणे योग्य ठरणार नाही, पण मागील ५ वर्षांत ट्रम्प यांची भूमिका कशी होती हे आपण पाहिले आहे आणि आज कसे वागतात ते देखील पाहत आहोत. डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर फारसा लक्ष देण्याची गरज नसल्याचेही त्यांनी सांगितले. परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत आपली भूमिका अशी आहे की, टॅरिफबाबत फारसे बोलत नाही, पण दुर्लक्षही करता येणार नाही असे पवार म्हणालेत. यावेळी त्यांनी शेजारी देशांशी संबंध सुधारण्याचा सल्ला दिला. भारताचा नकाशा पाहिला तर लक्षात येते की पाकिस्तान आपल्याविरुद्ध आहे, नेपाळ, श्रीलंका आणि बांगलादेश नाराज आहेत. म्हणजे आपल्या सगळ्या शेजारी देशांशी असलेल्या संबंधांमध्ये तणाव आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष करू नये. शेजाऱ्यांशी संबंध कसे सुधारायचे याकडे लक्ष दिले पाहिजे असे पवारांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जालना जिल्ह्यातील दोन उपविभागीय अधिकारी आणि चार तहसीलदारांना तातडीने निलंबित करा - आमदार बबनराव लोणीकर

## जालना जिल्ह्यातील नुकसान भरपाई घोटाळ्याप्रकरणी बबनराव लोणीकर यांची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

दि. २३ मे २०२५ महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या नुकसान भरपाईच्या अनुदान वाटपात झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणी गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात संबंधित उपविभागीय अधिकारी (अंबड आणि भोकरदन), तहसीलदार (अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफ्राबाद) यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांनी बोगस शेतकऱ्यांच्या नावाने कोट्यवधी रुपयांचे अनुदान हडप केल्याचा दावा लोणीकर यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.



**** प्रकरणाची पार्श्वभूमी ****

जालना जिल्ह्यात २०२२, २०२३ आणि २०२४ मध्ये अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यासाठी शासनाने सुमारे १५ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून अनुदान मंजूर केले होते. परंतु, हे अनुदान खऱ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी बोगस लाभार्थ्यांच्या नावे वळते करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. प्राथमिक माहितीनुसार, अंबड आणि घनसावंगी तालुक्यांमध्ये ५० कोटी रुपये बोगस लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा झाल्याचे समोर आले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने या घोटाळ्याची व्याप्ती १०० कोटींपर्यंत असल्याचा दावा केला आहे.

**** आरोपांचे स्वरूप ****

लोणीकर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफ्राबाद तालुक्यांमध्ये १२,००० बोगस शेतकऱ्यांच्या नावाने अनुदानाची रक्कम वळती करण्यात आली. यामध्ये बीड, अहिल्यानगर आणि बुलढाणा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची नावे यादीत घुसवण्यात आली. विशेष म्हणजे, एकाच शेतकऱ्याच्या नावे अनेकदा पैसे जमा करण्यात आले. यासाठी तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरण्यात आले, परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यकांनी संयुक्त पाहणी न करता बोगस अहवाल सादर केले, ज्यावर तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवणे अपेक्षित होते. परंतु, यादी फेरतपासणीच्या जबाबदारीकडे हलगर्जीपणा दाखवण्यात आला, ज्यामुळे डीबीटीद्वारे बोगस खात्यांमध्ये पैसे जमा झाले.

****प्रमुख आरोप****

***लॉगिन – पासवर्डचा गैरवापर***

तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून तलाठ्यांनी बोगस नावे अपलोड केली. याबाबत तहसीलदारांनी लक्ष न दिल्याने त्यांचा सहभाग किंवा निष्काळजीपणाचा संशय आहे.

****बोगस लाभार्थी****

अंबड आणि अहिल्यानगर येथील एका तलाठी दांपत्याने नातेवाइकांची नावे आणि बँक खाते क्रमांक ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केल्याचे उघड झाले.

****फेरतपासणीचा अभाव****

यादी अपलोड करण्यापूर्वी तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी फेरतपासणी न केल्याने बोगस लाभार्थ्यांना अनुदान मिळाले.

****पुरावे नष्ट करण्याचा संशय****

लोणीकर यांनी आरोप केला आहे की, संबंधित अधिकारी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करू शकतात, त्यामुळे त्यांना तात्काळ निलंबित करणे आवश्यक आहे.

***चालू चौकशी आणि कारवाई***

या प्रकरणात जिल्हाधिकारी, जालना यांनी उपविभागीय अधिकारी पुलकित सिंह, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे आणि नायब तहसीलदार श्रीमती लुणावत यांच्या त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी सुरू केली आहे. आतापर्यंत अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील ८० गावांमधील तपासणी पूर्ण झाली असून, १०–१२ गावांचा तपास बाकी आहे. पुढील १५ दिवसांत चौकशी अहवाल सादर होण्याची शक्यता आहे. या अहवालात तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्यासह उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या भूमिकेची तपासणी होईल.

****लोणीकर यांची मागणी****

आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या पत्रात उपविभागीय अधिकारी (अंबड आणि भोकरदन) आणि तहसीलदार (अंबड, घनसावंगी, भोकरदन, जाफ्राबाद) यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी केली आहे. तसेच, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशीसाठी विशेष तपास समिती (SIT) किंवा कॅग (CAG) यांच्यामार्फत तपास करण्याची विनंती केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, खऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी नव्याने पंचनामे करून पारदर्शक पद्धतीने यादी तयार करावी. तसेच, डिजिटल पुरावे (लॉगिन-पासवर्ड, डीबीटी रेकॉर्ड) सुरक्षित ठेवण्यासाठी डिजिटल फॉरेन्सिक ऑडिटची मागणीही त्यांनी केली आहे.

****महसूल मंत्र्यांचे निर्देश****

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यापूर्वी शेतकऱ्यांच्या हितासाठी कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. नुकसान भरपाई आणि पीककर्ज योजनांमध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची त्यांची भूमिका आहे. लोणीकर यांच्या पत्रानंतर बावनकुळे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, लवकरच याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी अपेक्षा आहे.

****शेतकऱ्यांचा संताप****

जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये या घोटाळ्यामुळे तीव्र संताप आहे. अनेक शेतकऱ्यांनी खऱ्या लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने या प्रकरणात आंदोलनाचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्या नुकसानीची भरपाई वेळेवर आणि पारदर्शकपणे मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

****पुढील पावले****

– लोणीकर यांनी हे प्रकरण विधानसभेत उपस्थित करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी करावी.

– स्थानिक शेतकरी संघटना आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सहकार्याने या प्रकरणाला व्यापक स्वरूप द्यावे.

– जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे सध्याच्या चौकशीचा अहवाल मागवून त्यात उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या भूमिकेचा समावेश आहे का, याची खात्री करावी.

– डिजिटल फॉरेन्सिक ऑडिट आणि पारदर्शक यादी तयार करण्यासाठी शासनाकडे मागणी करावी.

****निष्कर्ष****

जालना जिल्ह्यातील नुकसान भरपाई घोटाळ्याने शेतकऱ्यांवरील अन्याय उघड झाला आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केलेल्या या गंभीर प्रकरणामुळे प्रशासनावर दबाव वाढला आहे. आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि शासन याबाबत काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांना त्वरित न्याय मिळावा, हीच अपेक्षा आहे.

# संक्षिप्त

## परतुर इस्कॉनच्या वतीने आज श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

येथील आंतरराष्ट्रीय कृष्ण भावना मृत संघ इस्कॉन यांच्यावतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव २०२५ चे आयोजन दिनांक १० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी केले आहे सदरील कार्यक्रमात मराठवाडा इस्कॉन टेम्पल मॅनेजमेंट कमिटी हेड असलेले बालब्रह्मचारी श्री बलदेव प्रभुजी यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या महोत्सवामध्ये दुपारी २ ते ४ या वेळेत नगर संकेतन सायंकाळी ४.३० ते ५.३० या वेळेत श्री अभिषेक, सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम, सायंकाळी ६.३० ते ७.३० प्रवचन, ७.३० वाजता महाआरती व यानंतर सायंकाळी ८:०० वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन श्री वरद विनायक मंगल कार्यालय मेन रोड परतुर येथे करण्यात आले आहे.

तसेच इस्कॉन च्या वतीने प्रत्येक गुरुवार व एकादशी या दिवशी सत्संग व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला जातो सदरील कार्यक्रम सायंकाळी ६:३० ते ८ यादरम्यान डॉक्टर संदीपजी चव्हाण यांचे श्रीकृष्ण हॉस्पिटल सातोणकर मळा येथील तळमजला ठिकाणी आयोजित केले जाते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इस्कॉनचे सेवक सर्वश्री कैलासजी चव्हाण, डॉ. विजय राऊत, डॉ. रतन राय, ऍड, ओमप्रकाश प्रभू राऊत, सोनू हिवाळे, संजय महाराज, रतीराम प्रभुजी चव्हाण, सचिन काटे, व्यंकटेश व्यास, आशिष सुरूग, आर्यन मेहता यांच्यासह भक्त संप्रदाय परिश्रम घेत आहेत.

## परतुरात बेकायदेशीरपणे धारदार तलवारी बाळगणाऱ्या ०२ आरोपीतांना अटक एकुण (०४) तलवारी जप्त



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

परतुर शहरात अवैधरित्या धारदार तलवारी व शस्त्र बाळगणा–या इसमांची माहिती काढुन त्यावर कारवाई करण्याचे आदेशमा. पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक एस.बी. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांचे अवैधरित्या धारदार तलवारी व शस्त्र बाळगणा–या इसमांवर कारवाई करण्यासाठी पथके नेमलेले होते.

दिनांक ०८/०८/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक भागवत यांना माहिती मिळाली की, परतुर –पारडगाव रस्त्याच्या बाजुला व रेल्वे स्टेशन समोर एका घरामध्ये काही अवैधरित्या धारधार तलवारी बाळगत आहेत असे खात्रीशिर माहिती मिळाली होती. त्यावरुन श्री. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुचे दोन पथक अवैधरित्या धारधार तलवारी बाळगणा–या इसमांना पकडण्यासाठी सुचना देऊन आदेशीत केले होते.

पथकातील अधिकारी अंमलदार यांनी परतुर–पारडगाव रोडवरील घरामध्ये जाऊन पाहणी केली असता इसम नामे संतोष लक्ष्मण काळे वय ३२ वर्ष रा. परतुर–पारडगाव रोड, परतुर व एक महिला असे दोघे (०३) अवैधरित्या धारदार तलवारी बाळगतांना मिळुन आले आहे. तसेच रेल्वे स्टेशन समोर एका पत्र्याच्या शेडमध्ये इसम नामे गिरधारी दादाराव पवार वय ४३ रा. रेल्वे स्टेशन समोर, परतुर हा (०१) अवैधरित्या धारदार तलवार बाळगतांना मिळुन आला आहे. सदर तिन्ही आरोपीतांविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक एस.बी. भागवत, पोउपनि अमोल रावते, अंमलदार धर्मा शिंदे, किरण मोरे, गजानन राठोड, विजय जाधव, नरेंद्र चव्हाण, दशरथ गोपनवाड, पवनकुमार धापसे महिला अंमलदार कल्पाना धडे आय.टी. सेल अंमलदार सागर बाविस्कर यांनी केलेली आहे.

## मंठा पोलीस निरीक्षक म्हणून मनोजकुमार राठोड यांनी पदभार स्वीकारला



तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

मंठा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांची पदोन्नतीने बदली झाल्यामुळे मंठा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक पदाचा पदभार मनोजकुमार राठोड यांनी स्वीकारला. मनोजकुमार राठोड यांनी यापूर्वी जालना येथे प्रभारी होम डिवायएसपी तसेच आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागात त्यांनी काम केले आहे. त्यापूर्वी त्यांनी तुळजापूर, उमरगा, अहिल्यानगर यासह विविध ठिकाणी पोलीस निरीक्षक म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

मंठा पोलीस स्टेशनला रुजू झाल्यानंतर श्री राठोड यांचा विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी यांनी सत्कार केला. मंठा पोलीस स्टेशन हद्दीतील गुन्हेगारी कमी करण्याबरोबरच अवैध धंदे बंद करणे, शहरातील रहदारी व्यवस्थित करणे यावर भर देणार असल्याचे नूतन पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांनी सांगितले. त्यासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

# महात्मा फुले मार्केट उभारणी आणि जालना–नांदेड समृद्धी महामार्ग संदर्भात उद्या मुंबईत निर्णायक बैठक शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना शहरातील महात्मा फुले मार्केट उभारणी तसेच जालना – नांदेड समृद्धी महामार्गाबाबतची दीर्घकाळ प्रलंबित मागणी सोडवण्यासाठी उद्या, ७ ऑगस्ट रोजी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. या बैठकीला आमदार अर्जुन खोतकर प्रमुख उपस्थित राहणार असून, जालना शहरातील व्यापारी आणि महामार्गावरील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. जालना शहरातील व्यापाऱ्यांची महात्मा फुले मार्केट उभारणी ही दीर्घकाळ प्रलंबित मागणी आहे. शहरातील व्यापारी वर्गाने गेल्या काही महिन्यांत अनेक वेळा मोर्चे, धरणे आणि निवेदने देऊन शासनाचे लक्ष वेधले होते. व्यापारी वर्गाने स्पष्ट केले होते की, आधुनिक व सुसज्ज बाजारपेठेच्या अभावी त्यांचा व्यवसाय अडचणीत आला आहे आणि स्थानिक अर्थव्यवस्था प्रभावित होत आहे. महात्मा फुले मार्केट उभारणीमुळे केवळ व्यापाऱ्यांनाच नव्हे तर शेतकरी आणि ग्राहकांनाही सुविधा उपलब्ध होणार असून, स्थानिक बाजारपेठेत सुव्यवस्था निर्माण होईल. उद्याच्या बैठकीत या विषयावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. जालना – नांदेड समृद्धी महामार्गाच्या कामासाठी मागील तीन ते चार महिन्यांपासून शेतकऱ्यांनी विविध प्रकारची आंदोलने केली आहेत. जमीन संपादन, भरपाई आणि पुनर्वसनाशी संबंधित मागण्यांवर तोडगा निघालेला नाही. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, विकासकामांना आम्ही विरोध करत नाही; परंतु आमचे हक्क अबाधित राहणे आवश्यक आहे. समृद्धी महामार्गामुळे नांदेड, हिंगोली आणि जालना जिल्ह्यातील शेतीमाल वाहतुकीला गती मिळेल आणि औद्योगिक गुंतवणुकीस चालना मिळेल. त्यामुळे हा महामार्ग स्थानिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.



उद्याच्या बैठकीकडून शहरवासीयांना मोठ्या अपेक्षाशिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी सांगितले, व्यापारी आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांवर राज्यस्तरीय पातळीवर चर्चा होणार आहे. उद्याच्या बैठकीत सकारात्मक निर्णय होईल असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. जालनावासीयांनी केलेला सातत्यपूर्ण लढा आता फळाला येणार आहे

# अनिल जिंदल वर्ल्ड स्कूलमध्ये वेल्फेअर कमिटीची बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

अनिल जिंदल वर्ल्ड स्कूलमध्ये शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी वेल्फेअर कमिटीची महत्वपूर्ण बैठक गुरुवार दि. ६ ऑगस्ट रोजी पार पडली. त्यात शाळा सुधारणा, भविष्यातील दिशा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.



या बैठकीला सदस्य म्हणून प्रा. सुरेश लाहोटी, अभय कुलकर्णी, पंकज पाटनी, जितेंद्र अग्रवाल, दीपक पंच, सौ. आरती पित्ती, सौ. पूजा तवरावाला, सुदेश करवा, जय भगवान जिंदल, गोपाल जिंदल, प्रिन्सिपल शिल्पा लोखंडे उपस्थित होते.

या बैठकीत विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी सातत्याने तपासणी करणे आणि निकष ठरवणे, पालक आणि शिक्षक यांच्यात सशक्त संवाद साधण्यासाठी दर आठवड्याला पालक व क्षेत्रीय तज्ञांची बैठकीचे आयोज, शाळेची प्रभावी ब्रँडिंग आदी मुद्द्यांवर भर देण्यात आला तसेच विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी वापरली जाणारी प्रश्नपत्रिका दर्जेदार असावी, असा ठराव करण्यात आला. याशिवाय शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम, आंतरशालेय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग, विद्यार्थ्यांना औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रातील अनुभव देण्यासाठी भेटींचे आयोजन, विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता वाढवण्यासाठी परदेशी भाषा शिक्षण सुरू करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. या बैठकीत शाळेच्या प्रगतीसाठी विविध महत्वपूर्ण मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. ठरवलेले उपाय लवकरात लवकर अंमलात आणण्याचे व आवश्यक ते पुनरावलोकन वेळोवेळी करण्याचे निर्णय घेण्यात आला.

# जळगाव सपकाळ येथील आश्रम शाळेत जागतिक आदिवासी दिवस उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा
भोकरदन / प्रतिनिधी

जळगाव सपकाळ येथील आदिवासी आश्रम शाळेत आदिवासी दिन, क्रांती दिन व रक्षाबंधना निमत्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक अनिल सोनवणे तर प्रमुख अतिथी प्राचार्य ए.बी चोरमारे, प्रशासकीय अधिकारी चव्हाण मेडम छ. शिविजी विद्यालयचे मु. अ. सुभाष बावस्कर होतै. याप्रसंगी जळगाव सपकाळ येथील डॉक्टर विद्या मॅडम तसेच नितेश सपकाळ सर व इतर यांची टीम यांनी विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप केले.

या वेळी राजाराम दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी नृत्य, आदिवासी नाटिका, आदिवासी गित व आदिवासी समुदायचे संस्कृती बद्दल विद्यार्थ्यांनी भाषना मधुन आपले विचार व्यक्त केले. या मध्ये सचिन सोनुने, यश दांडगे, भगत सिंग ऋषिकेश, अनिकेत बावस्कर, इ. विद्यार्थानी सहभाग घेतला कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुनिल रोजेकर यांनी केले. वेळी तर आभार विजय पंडित यांनी केले सुनिल लोखंडे, जनार्दन कराड, संजय कोरडे, मोहन चित्ते प्रविण वाघमारे , अर्चना देशमुख, राजेन्द्र भोपळे, ज्ञानेश्वर दानवे, रामेश्वर रोजैकर, शरद जोशी, शुभम जाधव, सपकाळ मेडम, सोनुने मेडम ज्ञानेश्वर तिडके, गजानन रावळकर, सुनिल कानडजे, रोहिदास सोनुने, गणेश मुंढे उपस्थित होते.

# अखिल भारतीय अग्रवाल महासभा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची शपथविधी संपन्न प्रदेशाध्यक्षपदी सीमा पंच यांची फेरनिवड

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अखिल भारतीय अग्रवाल महासभा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी मंडळाचा शपथविधी सोहळा ४ ऑगस्ट रोजी हिंगोली येथे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. सतीश अग्रवाल, आयटी मीडिया सेल प्रमुख किशोर गुप्ता व प्रवक्ते कमलेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी फेरा निवड झालेल्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्ष सीमा अशोक पंच, सचिव शोभा अग्रवाल, प्रदेश कोषाध्यक्ष अनिता पित्ती, प्रदेश सांस्कृतिक मंत्री संतोष बगडिया, संघटन मंत्री पूनम अग्रवाल, ममता अग्रवाल (अकोला), मराठवाडा संघटन मंत्री डॉ. नीता बगडिया, मीडिया प्रभारी रश्मी केडिया (हिंगोली), जालना जिल्हाध्यक्ष ज्योती अग्रवाल, सचिव शितल धानवाला, सहकोषाध्यक्ष शुभा अग्रवाल, शहराध्यक्ष कोमल अग्रवाल, सहसचिव मीना अग्रवाल, वाशिम जिल्हाध्यक्ष अंजली अग्रवाल, सचिव सोनल अग्रवाल, हिंगोली जिल्हाध्यक्ष नीता कायल, महाराष्ट्र अध्यक्ष सपन बगडिया (हिंगोली), महाराष्ट्र उपाध्यक्ष दीपक अग्रवाल(अमरावती), विदर्भ प्रभारी पवन अग्रवाल (वाशीम), मराठवाडा सहयोजक सौरभ पंच, मराठवाडा सांस्कृतिक मंत्री सागर अग्रवाल, जालना जिल्हा प्रतिनिधी अनुप अग्रवाल, कोषाध्यक्ष परेश गजबी, जिल्हा संघटन मंत्री अनुज पंच, मीडिया प्रभारी बॉबी अग्रवाल, वाशीम जिल्हाध्यक्ष जीवन अग्रवाल, इंदू निमोदीया, लिला निमोदीया आणि



इंदु भारूका आदींचा शपथविधी पार पडला. यावेळी सर्वांनी समाजाविषयी एकनिष्ठ राहण्याची, सामाजिक बांधिलकी जपण्याची आणि समाजाला संघटित करण्याची शपथ सर्वांनी घेतली.

याप्रसंगी सुशील गोपाल बजाज (हैदराबाद) यांच्या सुमधुर वाणीतून श्री बाबा रामदेवजी बाबा यांचा विशाल जम्मा जागरण पार पडला. या कार्यक्रमाला समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मृत्यूनंतर अवयवदानाने दिले तिघांना जीवनदान



छत्रपती संभाजीनगर -

इचलकरंजी येथून पाच वर्षांपूर्वी छत्रपती संभाजीनगरमध्ये स्थायिक झालेले किशोर राठी हे अवघ्या ६० व्या वर्षी या जगाचा निरोप घेतानाही अवयवदानाने तीन जणांना जीवनदान देत एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी किशोर राठी हे शाहनूरमिया दर्गा परिसरातून दुचाकीवर जात असताना त्यांना अचानक चक्कर आली, पादचाऱ्यानी कळवल्यानंतर नातेवाईकांनी तातडीने त्यांना कमलनयन बजाज रुग्णालयात दाखल केले.

मेंदूत मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता आणि डॉक्टरांनी त्यांना ब्रेन डेड घोषित केले. या अत्यंत दुःखद प्रसंगी, डॉ. गोसावी यांनी राठी यांच्या नातेवाईकांशी चर्चा करत, त्यांच्या अवयवदानामुळे इतर रुग्णांना जीवनदान मिळू शकते, असे सांगितले. याला सकारात्मक प्रतिसाद देत त्यांच्या पत्नी सुनीता राठी, दोन मुले ऋषिकेश व प्रथमेश आणि विजय, प्रकाश, विष्णुदास, घनश्याम राठी या चार भावांनी एकमताने अवयवदानासाठी परवानगी दिली.

या निर्णयानुसार, शहरातील कमलनयन बजाज रुग्णालयातील एका रुग्णाला एक किडनी, तर एमजीएम रुग्णालयातील एका रुग्णाला दुसरी किडनी प्रत्यारोपित करण्यात आली. तसेच त्यांचे लिव्हर नागपूर येथील न्यू एरा मदर अँड चाईल्ड रुग्णालयात पाठवण्यात आले. अशा प्रकारे, त्यांच्या निधनानंतर तीन रुग्णांना नवजीवन मिळाले.

कमलनयन बजाज रुग्णालयातील सर्जन डॉ ओसवाल आणि डॉ. शिवाजी तौर , अतिदक्षता विभागातील (खउण) तज्ञ डॉ. विनोद गोसावी, डॉ गीता फेरवानी, मेडिकल डायरेक्टर डॉ. अजय रोटे, सिनिअर कन्सलटंट डॉ. मिलिंद वैष्णव आणि सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडीस यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य या कार्यात मोलाचे ठरले. या अवयवदानाच्या महान कार्यानंतर, कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने किशोर राठी यांना मानवंदना देण्यात आली. रुग्णालयातील वैद्यकीय आणि प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी सर्व जण राठी कुटुंबियांच्या दुःखात सहभागी झाले.

एक निर्णय - तीन जीवन!

तुमचाही एक निर्णय, अनेकांना जीवनदान देऊ शकतो. त्यामुळेच आपण सर्वांनी या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून, अवयवदानासाठी पुढे यावे.

मरणोत्तर जीवनाचा दीप उजळवा - अवयवदान करा!

कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने जनजागृतीसाठी आवाहन केले आहे.

## एमबीए प्रवेश आता स्नॅप टेस्ट २०२५ च्या माध्यमातून खुले

मुंबई - सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) ने सिम्बॉयसिस नॅशनल ॲप्टिट्यूड (स्नॅप) टेस्ट २०२५ या एमबीए करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच्या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षेचे अर्ज अधिकृतरित्या खुले केले आहेत. उत्कृष्ट शैक्षणिक कारकिर्दीच्या पाच दशकांहून अधिक अनुभवासह सिम्बॉयसिस हा मॅनेजमेंट शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कायमच प्राधान्यक्रम राहिला आहे. कारण, हा अभ्यासक्रम जागतिक पातळीशी सुसंगत, उद्योगक्षेत्राशी संबंधित आणि सखोल अभ्यास असलेला आहे.स्नॅप २०२५ साठी नोंदणी आणि शुल्क भरण्याचा कालावधी १ ऑगस्ट २०२५ (शुक्रवार) रोजी सुरू झाला आहे आणि २० नोव्हेंबर २०२५ (गुरुवार) पर्यंत ही मुदत आहे. ही कम्प्युटर-बेस्ड टेस्ट (सीबीटी) तीन तारखांना घेतली जाईल आणि विद्यार्थ्यांना तीन वेळा ही परीक्षा देता येईल. प्रवेशासाठी यातील सर्वोत्तम गुण ग्राह्य धरले जातील.

## 'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' द्वारे जीवनाच्या उत्सवात अधिक तेजस्वीपणा आणत आहे.

पुणे - ९ ऑगस्ट २०२५: भारतातील आघाडीच्या ज्वेलरी ब्रँडपैकी एक, डिव्हाईन सॉलिटेअर, त्यांच्या बहुप्रतिक्षित सॉलिटेअर फेस्टिव्हलची चौथी आवृत्ती - 'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' (ढडत्रख) घेऊन येत आहे. हा महोत्सव १ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान १००+ शहरांमधील ब्रँडच्या भागीदार रिटेल स्टोअरमध्ये आयोजित केला जात आहे. हा महोत्सव हिऱ्यांच्या खरेदीच्या अनुभवात उत्साह, चमक आणि उत्सव आणेल. 'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' द्वारे, डिवाइन सॉलिटेअर जीवनातील सर्वात खास आणि दैवी क्षणांना उंचावून दाखवते - जसे की प्रेमाची कबुली, एखादी कामगिरी किंवा संस्मरणीय क्षण - आणि प्रत्येक सॉलिटेअर खरेदीवर ग्राहकांना एक आनंददायी आश्चर्य म्हणून खात्रीशीर भेटवस्तू देखील देते.भेटवस्तू स्पिन द व्हील, पिक १ ऑफ थ्री सरप्राईज किंवा पुढील खरेदीवर डिवाइन व्हाउचरच्या स्वरूपात असू शकतात.

## कन्नड-सोयगाव विधानसभा अध्यक्षपदी लखन चव्हाण मनसे जिल्हाध्यक्ष वैभव मिटकर यांची घोषणा



कन्नड -दि.०९ ऑगस्ट - महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कन्नड-सोयगाव विधानसभा क्षेत्राला नवीन नेतृत्व मिळाले आहे. जिल्हाध्यक्ष वैभव मिटकर यांनी लखन रोहीदास चव्हाण यांची विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली. पक्ष संघटन उभारणीमध्ये सातत्याने योगदान देणारे आणि विविध स्थानिक प्रश्नांवर भूमिका मांडणारे कार्यकर्ते म्हणून चव्हाण यांची ओळख असून, त्यांच्या कामाचा विचार करून पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. जिल्हाध्यक्ष वैभव मिटकर यांनी सांगितले की, कन्नड-सोयगाव विधानसभा क्षेत्रात पक्षविस्तार, जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांचे संघटन या कामासाठी लखन चव्हाण योग्य ठरतील. त्यांच्या नेतृत्वाखाली मनसेची भूमिका अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचेल. गेल्या काही वर्षांपासून चव्हाण विविध सामाजिक आणि स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर सक्रिय आहेत. त्यांनी शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर मनसेची भुमिका स्पष्टपणे मांडली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन उत्साह निर्माण झाल्याचे वातावरण आहे.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये रक्षाबंधन सण साजरा



बिडकीन दि ९ ऑगस्ट- दरवर्षी श्रावण महिन्यातील पौर्णिमेला रक्षाबंधन सण साजरा केला जातो. या दिवशी बहिण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची समृध्दीसाठी देवाकडे प्रार्थना करतात. भाऊ देखील आपल्या बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो. याच निमित्ताने आज दि. ९ ऑगस्ट रोजी. पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतिलाल शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाच्या गाण्यावर नृत्य सादर केले. विद्यार्थीनींनी - विद्यार्थ्यांना औक्षण करुन हातावर राखी बांधुन रक्षाबंधन हा सण शाळेमध्ये साजरा केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक - शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

## भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्थेची आज २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभाचे आयोजन

सोयगाव,दि. ९ ऑगस्ट - सोयगाव येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित सोयगाव यांची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१० रविवार रोजी मध्यवर्ती बँकेच्या वरती नॅशनल हायस्कूल सभागृह सोयगाव येथे सकाळी १०:०० वाजता आयोजित करण्याचे ठरविले आहे.संस्थेच्या सर्व सभासद,प्रमुख पाहुणे यांना अहवाल पाठविला आहे.ज्यांना अहवाल मिळाला नाही अशा सभासदांनी हाच अहवाल समजून सभेस वेळी व स्थळी उपस्थित रहावे ही विनंती असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी केले आहे. सभेपुढील येणारे विषय विषय क्रमांक एक मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत चा वृत्तांत वाचून कायम करणे,विषय नंबर दोन सन.२०२४-२५ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे, विषय नंबर तीन सन.२०२४-२५ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे आदी विषयावर चर्चा होणार आहे.

## सोयगाव शहरात जागतिक आदिवासी दिन संपन्न



सोयगाव,दि.९ ऑगस्ट - सोयगाव शहरात जागतिक आदिवासी दिनानिमित्त सर्व आदिवासी बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे येऊन महर्षी वाल्मिक ऋषी,जननायक तंट्या भिल,छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,एकलव्य संत क्रांतिकारी महामानव,यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक हर्षल काळे,संदीप सुरडकर,संतोष बोडखे,भगवान जोहरे,राजू माळी,राजेंद्र काळे,राजेंद्र दुतोंडे,कदिर शहा,विवेक महाजन,संदिप चौधरी,शालीक गवळे,भगवान इंगळे,आनंदा इंगळे,चंद्रास आप्पा बावस्कर,पुंजाजी जाधव,पांडुरंग दांडगे,शिवाजी माळी,खंडू जोहरे,गणेश इंगळे,राजेश सोनवणे,सुनील ठोंबरे,दत्तू आस्वार,शंकर जेठे,संतोष राऊत,गणेश जोहरे,विक्रम इंगळे,सोनू सोनवणे,रघुनाथ बावस्कर,भगवान टोकरे,मंगेश सपकाळ,संजय मोरे,जीवन पाटील,शिवाजी इंगळे,यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.

## छावा चित्रपट प्रेक्षकांना मराठीत पाहता येणार

छत्रपती संभाजीनगर : २०२५ मधील सर्वात चर्चित छावा चित्रपट येत्या १७ ऑगस्ट रोजी, रविवार, रात्री८ वाजता स्टार गोल्ड वाहिनीवर पाहता येणार आहे. पहिल्यांदाच स्टार गोल्ड वाहिनीवर प्रेक्षकांना छावा मराठीत आणि हिंदीत पाहता येणार आहे. निवडक ऑपरेटरद्वारे हा चित्रपट आता मराठीमध्ये घरबसल्या प्रेक्षकांना पाहता येणारअसून, ज्यात छत्रपती संभाजी महाराजांची कथा त्यांच्या मातृभाषेत घरोघरी पोहोचणार आहे. हा ऐतिहासिक चित्रपट छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय जीवनप्रवासाला पडद्यावर जिवंत करतो - ज्यांच्या पराक्रमाने भारतीय इतिहासाची दिशा घडवली.

पंजाब एण्ड सिंध बैंक
PUNJAB & SIND BANK
(भारत सरकारचा उपक्रम)
मुंबई अंचल

जागेची आवश्यकता

शाखा उघडणे / स्थलांतरित करण्यासाठी निम्न परिसरात तळमजल्यावरील जागा किमान १५ वर्षांसाठी भाडेपट्टीवर घेण्यास बँक इच्छुक आहे.

| शाखेचे नाव व परिसर | चटई क्षेत्र चौ.फूट |
|---|---|
| १. धाराशिव शहर, जि. धाराशिव, महाराष्ट्र | १२०० चौरस फूट पर्यंत |
| २.जालना शहर, जि जालना, महाराष्ट्र | १२०० चौरस फूट पर्यंत |

इच्छुक पक्षांकडून दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये निर्धारित नमूयात तांत्रिक व आर्थिक बोलीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये मोहोरबंद निविदा जमा करण्याची अंतिम तारीख ३० ऑगस्ट २०२५ आहे.

अधिक तपशीलाकरिता बँकेच्या वेबसाइट www.punjabandsindbank.co.in ला भेट द्या.

आंचलिक प्रबंधक,
मुंबई

## महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याविरुद्ध समाज माध्यमावर बदनामीकारक मजकूर पोस्ट करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल व आरोपी अटक



जिंतूर -तालुक्याचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार तथा परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री सौ मेघना बोर्डीकर साकोरे यांच्या विरुद्ध समाज माध्यमावर बदनामीकारक मजकूर पोस्ट करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मंत्री सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांच्याविरुद्ध माध्यमातून, सोशल मीडियावर वारंवार जिंतूर येथील फेक अकाउंट द्वारे पोस्ट करणाऱ्या व्यक्तीस २८ रोजी गुन्हा दाखल होता त्यावर पोलीस प्रशासनाने रात्री आरोपीला अटक केली असता त्यात आरोपी माजी आमदार विजय भांबळे यांचे पुतणे पृथ्वीराज भांबळे हे निघाले असता तालुक्यातील बोर्डीकर कुटुंबाच्या वतीने पोलीस स्टेशन जिंतूर येथे गर्दी केली होती. जिंतूर तालुक्यातील मागील काही दिवसा पासून जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याविरुद्ध विष्णू नागरे नावाने फेसबुक अकाउंट द्वारे बदनामीकारक पोस्ट करणाऱ्या व्यक्ती सायबर क्राईमने ब्रांच ने ताब्यात घेतले असून बोर्डीकर यांचे कट्टर विरोधक माजी आमदार विजय भांबळे यांचा तो पुतण्या असल्याची माहिती प्राप्त झाली. विष्णू नागरे नामक व्यक्तीने फेसबुक अकाउंट द्वारे पालकमंत्री यांच्या विरोधात पोस्ट व्हायरल करण्यास सुरुवात केली अलीकडे काही पोस्ट व्हायरल केल्यामुळे मेघना बोर्डीकर साखोरे यांच्या मूळ गावी बोर्डी येथील बोर्डीकर कुटुंबाने जिंतूर पोलीस स्टेशन येथे तक्रारी दाखल केल्या आधारे विष्णू नागरे नावाने चालविणारा फेसबुक अकाउंट पृथ्वी प्रमोद भांबळे नामक व्यक्ती बुधवारी पहाटे ताब्यात घेतला आहे त्या व्यक्तीची तातडीने चौकशी करावी अशी मागणी बोर्डीकर कुटुंबातील मेघनाताई बोर्डीकर यांचे चुलत भाऊ शिवाजीराव कदम यांनी केली आहे दरम्यान संबंधित व्यक्ती हा माजी आमदार विजय भांबळे यांच्या पुतण्या आहे त्यामुळे जिंतूर तालुक्यात राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

## सोशल मीडियावर वंजारी समाजाच्या बदनामी प्रकरणी मूक मोर्चा



जिंतूर जिंतूर तालुक्यातील सकल वंजारी समाजाचा महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांच्या बद्दल विष्णू नागरे नावाचा वापर करून माजी आमदाराच्या पुतण्याने वंजारी समाजाची बदनामी केल्याप्रकरणी वंजारी समाजाचा जिंतूर येथे भगवान बाबा चौक येथून समाज बांधव मोठ्या संख्येने जमलेतो मूक मोर्चा तहसील कार्यालय या ठिकाणी नेण्यात आला व त्या ठिकाणी जिंतूर चे तहसीलदार श्री राखे साहेब व जिंतूरचे पोलीस निरीक्षक श्री सरोवदे साहेब यांना निवेदन देण्यात आले या निवेदनात असे म्हटले आहे की फेसबुक सारखे सोशल मीडियावर वंजारी समाजाची बदनामी करण्याच्या उद्देशाने जिंतूर तालुक्यातील माती फिरू पृथ्वी भांबळे यांनी विष्णू नागरे नावाने बनावट खाते उघडून पोस्ट करून समाजाचा दोन समाजात ते तेढ निर्माणकरण्याचा प्रयत्न केला आहे तसेच राज्यातील प्रतिष्ठित व्यक्ती बदनामीकारक पोस्ट करीत वंजारी समाजाशी बदनामी केली आहे तसे दोन समाजात ते निर्माण करण्याचा प्रयत्न देखील या माथेफिरू नये केलेला आहे यामुळे समाजाची राज्यस्तरावर बदनामी झालेली आहे अशा प्रकारच्या गोष्टी पुढील काळात होऊ नये म्हणून आपल्या सदरील माथेफिरु विरुद्धकठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती तसेच यापुढे अशा प्रकारच्या घटनाघडल्यास रस्त्यावर समाज उतरल्याशिवाय राहणार नाही व त्यामुळे कायदा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही आपणावर राहील या निवेदन वरसंपूर्ण समाज बांधव आपला रोसव्यक्तकरीत आहे

या निवेदनावर लक्ष्मण इलक प्रसादराव बुधवंत डॉक्टर पंडितराव दराडे माधव दराडे रामप्रसाद घुले शिवाजी काळे भानदास घुगे वाल्मीक टाक सुयोग मुंडे कासाबाई बुधवंत अशोक बुधवंत संदीप घुगे पुरुषोत्तम घुगे रामराव घुगे रवी घुगे वैष्णवी कुलकर्णी शोभा पावडे चांगुबाई सांगळे विष्णु सातव देवराव घुगे संतोष पालवे प्रवीण कांदे आदींच्या स्वाक्षरीआहेत

## अंबोलेन्स चालकांच्या हाती आर्य चाणक्यचा रेशीम धागा

तभा वृत्तसेवा



पैठण दि ०९ :- रक्षाबंधनाच्या पवित्र उत्सवाचे औचित्य साधून आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरात 'जीवरक्षकांच्या हाती, आर्य चाणक्याची राखी'हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमास शहरातील परिसरातील सर्व रुग्णवाहिका चालक उपस्थित होते. रुग्णवाहिकेचा सायरन वाजला की आपले काळीज धस्स होते,आज चक्क सहा रूग्णवाहिका सायरन वाजवत आर्य चाणक्य च्या प्रांगणात दाखल झाल्या. ऐरवी हा आवाज नकोसा वाटतो पण आज त्याच आवाजाने विद्यार्थ्यांचे कुतूहल जागे केले.

रक्षाबंधनाच्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शहराला २४ तास तत्काळ सेवा देऊन अगणित जीवांचे रक्षण करणारे ,रूग्णवाहिका चालक सुनिल चन्ने,संतोष नरवडे,अक्षय थोटे,सलीम शेख ,गणेश वीर ,संदिप सरग यांच्याहाती शाळेतील अनेक शिक्षिका आणि विद्यार्थिनींनी राख्या बांधल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर कुलकर्णी यांनी आलेल्या प्रमुख अतिथींचे समाजातील योगदान स्पष्ट करत 'तुम रक्षक काहू को डरना' असे सांगून त्यांचे महत्त्व विशद केले. वेळेला धावून येणाऱ्याचे मोल पृथ्वीच्या तोलाचे असते,या तोडीस या सर्वांचे समाजात कार्य चालते. सावित्रीने तरी यमा कडून स्वतःच्या पतीचे प्राण आणले, परंतु प्रत्येक क्षणाला मरणाच्या दारात असणाऱ्या रुग्णाला डॉक्टर नावाच्या देवतेपर्यंत तत्काळ पोहोचविण्याचे कार्य करणारे हे जणू वीर हनुमानच आहेत असे प्रतिपादन करत त्यांचे ऋण व्यक्त केले. तत्परतेचा रंगच मुळी पांढराशुभ्र आहे कॉल आल्याक्षणी हजर अशी सेवा देणाऱ्या या सर्व चालकांना विद्यार्थ्यांनी नमस्कार केला.

रक्षाबंधन,क्रांतिदिन यांना अनुसरून इयत्ता पाचवी मधील सुमित शेलाटे व गट, श्रेया कानडे व गट, आरिफ खान पठाण व गट,आरुषी मानधने इत्यादी नी नृत्य आणि नाटक सादरीकरण यांनी केले.समृद्धी डिघुळे यांनी रक्षाबंधनाचे मार्गदर्शन केले, तर विनोद सरोदे यांनी क्रांती दिनानिमित्त महात्मा गांधी यांचे जीवन चरित्र व स्वतंत्र लढ्यातील क्रांतिकारकांची माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रातील अध्यक्ष व प्रमुख अतिथी राखी धोकटे ,प्रियंका निकाळजे, प्रमोद काकडे ,चंद्रकांत घोलप आदी होते. तदनंतर सर्व विद्यार्थ्यांनी एकमेकांना राखीचे रेशमी धागे बांधून रक्षाबंधन हा साजरा केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी चि. यशवर्धन कुलकर्णी, आभार प्रदर्शन चि. विराज सरोदे याने केले.

### जाहिर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : २०/०९/२०२५ दि.कि.अर्ज क्र. ३९४/२०२५

अर्जदार : १) तुळसाबाई भ्र. संजय ढोणे, वयः ४७ वर्षे, धंदाः घरकाम, रा. चिमनापूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, २) अक्षय पि. संजय ढोणे, वयः २५ वर्षे, धंदाः शेती, रा. चिमनापूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३) वैभव पि. संजय ढोणे, वयः २३ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. चिमनापूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक / निल

अर्ज - बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील नामे संजय नामदेव ढोणे हे दि. १९/०६/२०१४ रोजी मौजे चिमनापुर, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत संजय नामदेव ढोणे यांना अर्जदार क्र. १ ते ३ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०७/०८/२०२५

आदेशावरुन

लिपिक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. २९८/२०२५

अर्जदार :- १. भाउसाहेब पि. आसाराम हिवाळे, वय ७० वर्षे, धंदा निरंक, २. शांताराम पि. आसाराम हिवाळे, वय ५५ वर्ष, धंदा शेती, ३. दादाराव पि. आसाराम हिवाळे, वय ५० वर्ष, धंदा शेती, सर्व रा. भिवधानोरा ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर ४. द्वारकाबाई भ्र. रायभान केदारे, वय ४५ वर्ष, धंदा शेती, रा. सावखेडा, ता. गंगापुर, जि. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार हे आपसात सख्ये भाउ बहीन असुन अर्जदारांचे वडील नामे आसाराम पि. फकिरा हिवाळे, रा. भिवधानोरा, ता. गंगापुर हे दिनांक १९/११/२००७ रोजी मौजे भिवधानोरा, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. मयत आसाराम यांचे आई वडील व पत्नी हे फार आधीच मयत झालेले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक ०८/०८/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. ३९७/२०२५

पुढील तारीख १२/०९/२०२५

अर्जदार :- १- संजय वाळुबा वाघ, वय- २९ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. पळशी (खु) ता. कन्नड जि. औरंगाबाद २- सुनिता भाऊसाहेब सगळे, वय ३५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. रोहिणी ता. चाळीसगाव जि. जळगाव, ३- अनिता बाबासाहेब घुगे, वय- ३१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. निंभोरा ता. कन्नड जि. औरंगाबाद

-विरुध्द-

गैरअर्जदार - निरंक

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. २ व ३ यांचा भाऊ असुन अर्जदार क्र. २ व ३ या अर्जदार क्र. १ च्या विवाहित बहीनी आहे, अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील नामे वाळुबा केशव वाघ हे होते ते दिनांक ०१/०४/२०२४ रोजी मौजे पळशी (खु) ता. कन्नड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई नामे जनाबाई वाळुबा या होत्या त्या देखील दिनांक २८/०५/२०२० रोजी मयत झालेल्या आहे. दोन्ही मयतांचे अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहे, अर्जदार यांना वाळुबा केशव वाघ यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल, ग्राम पंचायत कार्यालयात मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी तसेच शासकिय व निमशासकिय योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच मयत वाळुबा केशव वाघ यांचे नावे असलेली मौजे पळशी (खु) शिवारातील जमीन गट नं. ६० मधील क्षेत्र हे उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प १ मध्ये नवीन रोड साठी संपादीत झालेली असून प्रकल्प ग्रस्त प्रमाणपत्र काढण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक ०७/०८/२०२५

आदेशावरुन

लिपिक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. पाटील साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः ४०३/२०२५ पु. तारीख : १०/०९/२०२५

अर्जदार- १. सौ. वंदना भ्र. विजय श्रीनाथे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा.मु. आपतगांव, पो. भालगांव, ता. व जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद). २- आनंद पिता महादु उर्फ माधव मोरे, वय ३५ वर्षे, धंदा मजुरी, रा.मु. पो. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ३- संदीप पिता महादु उर्फ माधव मोरे, वय २४ वर्षे, धंदा मजुरी, रा. मु.पो. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ४-रंजना भ्र. लक्ष्मण वाल्डे, वय २२ वर्षे, धंदा घरकाम, रा.वेदीका सदन, प्लॉट नं. ११, साईबाबा नगर, नरसिंगपुर कन्नड, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी. एम. राहाणे, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार १ ते ४ हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ चे वडील नामे माधव उर्फ महादु रामराव मोरे हे दिनांक १७.५.२०१८ रोजी मौजे अंधानेर, ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झाले आहेत, तसेच त्यांच्या पत्नी व अर्जदार क्रमांक १ ते ४ यांची जन्मदाती आई यशोदाबाई भ्र. महादु उर्फ माधव मोरे या दिनांक ११.१.२०२३ रोजी मौजे अंधानेर, ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झाले आहेत. मयताचे ग्राम पंचायत कार्यालय अंधानेर, ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या महसुल नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस दिनांक २४.७.२०२५ रोजी कारण घडले आहे. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतास कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार १ ते ४ हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. अर्जदार यांनी मुळ सोबत स्वतःचे आधार कार्ड तसेच ग्राम पंचायत, कार्यालय अंधानेर, ता. कन्नड यांचे मृत्यु प्रमाण पत्र विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल केले आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात. व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत्त आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ०८/०८/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : ०८/०८/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# शेतकरीहितैषी मोदी

शेतकरी, मासेमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताशी सरकार कधीच तडजोड करणार नाही, यासाठी वाट्टेल ती किंमत चुकवायची माझी तयारी आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले. देशातील कृषी क्रांतीचे प्रणेते डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राजधानी दिल्लीत आयोजित त्रिदिवसीय संमेलनाचे उद्घाटन करताना मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असल्याचा निर्वाळा दिला. मोदी यांचे हे विधान देशातील शेतकऱ्यांना दिलासा देणारे आणि त्यांच्या आशा-अपेक्षा उंचावणारे म्हटले पाहिजे. भारत हा कृषिप्रधान देश असल्याचे म्हटले जाते. शेतकऱ्यांचा उल्लेख 'बळीराजा' असा केला जातो. काही जण शेतकऱ्यांना 'अन्नदाता' असेही म्हणतात. शेतकरी जर शेतात राबला नाही तर आपल्याला पोटभर खायला मिळणार नाही. देशातील १४० कोटी जनतेला पोटभर खायला मिळावे म्हणून शेतकरी दिवसरात्र आपल्या शेतात राबत असतो, काबाडकष्ट करीत असतो. दुसऱ्याला पोटभर अन्न मिळावे म्हणून त्याला वेळप्रसंगी अर्धपोटी राहावे लागते. देशात आतापर्यंत होऊन गेलेल्या राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांवर ही वेळ आली, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. बळीराजा म्हणवणाऱ्या शेतकऱ्यांचा बळी सरकारी चुकीच्या धोरणामुळे जाऊ लागला.

आपली अर्थव्यवस्था कृषिआधारित आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १८ टक्के आहे. देशातील जवळपास अर्धी म्हणजे ४४ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील ७० टक्के अर्थव्यवस्था कृषी आणि त्याच्याशी संबंधित उद्योगांवर अवलंबून आहे. तरीसुद्धा आमच्या देशाच्या आतापर्यंत होऊन गेलेल्या धोरणकर्त्यांनी कृषी क्षेत्राकडे पाहिजे तसे लक्ष दिले नाही; त्याकडे दुर्लक्ष केले, असे अतिशय खेदाने आणि नाईलाजाने म्हणावे लागते. २०१५-१६ मध्ये कृषी क्षेत्रात झालेल्या जनगणनेनुसार देशातील ८६ टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत, म्हणजे त्यांच्याकडे २ हेक्टरपेक्षाही कमी शेतजमीन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती दयनीय झाली आहे. गेल्या काही वर्षांत देशात सर्वाधिक आत्महत्या या शेतकऱ्यांच्या आहेत. आत्महत्या हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही; उलट आत्महत्येने आहे त्या समस्या आणखी गंभीर रूप धारण करत असताना शेतकरी आत्महत्या करतात, याचाच अर्थ त्यांच्या जीवनातील सर्व उमेद संपली असणार, ते आपल्या आयुष्याला कंटाळले असणार, असा काढायला हरकत नाही. कोणीही आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय सहजासहजी घेत नाही. जगण्याचे सर्व मार्ग बंद झाल्यानंतर नाईलाजाने या मार्गाची निवड केली जाते. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या पूर्णपणे थांबल्या नसल्या तरी कमी मात्र झाल्या आहेत, हे मान्य केलेच पाहिजे. ५६ इंची छातीवाल्या मोदी यांची ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. शेतकऱ्यांची स्थिती 'आई जेवू घालिना आणि बाप भीक मागू देईना' अशी असते. म्हणजे शेतीतून त्याला चटणी-भाकरी खाऊ शकेल, एवढेही उत्पन्न मिळत नाही. बाहेरूनही कोणी त्याला मदत करत नाही. परिणामी शेतकऱ्याला ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जगता येत नाही. देशातील कोणत्याही वस्तूच्या उत्पादकाला जो तयार करत असलेल्या वस्तूची किंमत ठरवण्याचा अधिकार असतो. वस्तूच्या उत्पादनासाठी येणारा खर्च, वाहतूक खर्च, सर्व प्रकारचे सरकारी कर, वितरकाचा तसेच स्वतःचा नफा धरून उत्पादक त्या वस्तूची विक्री किंमत ठरवत असतो. पण हे स्वातंत्र्य आणि अधिकार शेतकऱ्यांना नाही. शेतकरी आपल्या शेतात पिकवत असलेल्या कृषी उत्पादनाची किंमत शेतकरी नाही तर सरकार ठरवत असते. शेतकऱ्यावर पहिला अन्याय याच ठिकाणी होत असतो. शेतकऱ्यांकडून किमान हमी भावात एखादे कृषी उत्पादन घेतल्यानंतर बाजारात ते किती किमतीत विकले जाते, यातील तफावत लक्षात घेतल्यावर शेतकऱ्यांची कशी लूट होत आहे, हे आपल्या लक्षात येईल. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतले गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान किसान सन्माननिधीसारखी योजना सुरू केली. ही योजना देशभरात यशस्वीपणे आणि प्रभावीपणे राबविली जात आहे. या योजनेत देशातील शेतकऱ्यांना दर तीन महिन्यांनी दोन हजार रुपये दिले जातात. या योजनेतील विसावा हप्ता नुकताच वाराणसी येथे आयोजित कार्यक्रमात मोदी यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने मोदी सरकारने अनेक निर्णय घेतले. अनेक पिकांच्या किमान हमी रकमेत (एमएसपी) लक्षणीय वाढ केली. ज्यांच्या नावाने आयोजित कार्यक्रमात मोदी यांनी शेतकऱ्यांच्या हिताशी कदापि तडजोड करणार नाही, अशी खात्री दिली, ते डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांना शेतकऱ्यांचे हितचिंतक म्हटले पाहिजे. एमएसपीची संकल्पना ही डॉ. स्वामीनाथन् यांचीच म्हटली पाहिजे. कृषी उत्पादनाची किंमत ठरवताना त्यात उत्पादन खर्चासोबत किमान ५० टक्के नफाही जोडला पाहिजे, हा आग्रह डॉ. स्वामीनाथन् यांनी धरला होता आणि सरकारला तो मान्य करावा लागला होता. स्वामीनाथन् यांनी देशात खाद्यान्न सुरक्षेचा आग्रह धरला; एवढेच नाही तर कृषी क्षेत्राला आत्मनिर्भर करण्यासाठी अनेक पावले उचलली. गहू आणि तांदळाचे हेक्टरी उत्पन्न वाढवणारे वाण विकसित केले. यामुळे देशातील अन्नधान्याचा दुष्काळ नेहमीसाठी संपला. कृषी उत्पादनात भारत आत्मनिर्भर झाला. अमेरिका आणि अन्य पाश्चात्त्य देशांचे हेच खरे दुखणे आहे. कधीकाळी आपल्याला अमेरिकेतून तेथील जनावरेही खात नव्हती, अशा निकृष्ट प्रतीच्या धान्याची म्हणजे मिलोची आयात करावी लागली होती. देशातील शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी मोदी अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला टक्कर देत आहे. दूध, डाळी आणि ज्यूट उत्पादनात भारत जगात आघाडीवर आहे तर गहू, तांदूळ, कापूस, फळ आणि भाज्यांच्या उत्पादनात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हडेलहप्पी करत भारतावर आधी २५ आणि नंतर पुन्हा २५ असा ५० टक्के आयात कर लादला आहे. याचा सरळ फटका भारतातील कृषी क्षेत्राला आणि शेतकऱ्यांना बसणार आहे. म्हणजे आम्ही भारतातून जी कृषी उत्पादने अमेरिकेला पाठवू, त्यांच्या किमती तेथे ५० टक्क्यांनी वाढणार आहेत. याचा अर्थ आम्ही आज जे कृषी उत्पादन अमेरिकेत १०० रुपयात पाठवत होतो, त्यासाठी आता १५० रुपये खर्च करावे लागणार. परिणामी या कृषी उत्पादनांच्या अमेरिकेतील किमती वाढतील, त्या महाग होतील. एखादी वस्तू महाग झाल्यावर त्याची मागणी कमी होते. मागणी कमी झाल्यावर त्याची आपल्या देशातून होणारी निर्यात कमी होईल. अमेरिकेला आपल्या देशातील कृषी उत्पादन आणि दुग्ध उत्पादनासाठी भारतीय बाजारपेठ हवी आहे. त्यामुळे अमेरिकेतून भारतात येणारा मका, सोयाबीन, सफरचंद, बदाम आणि इथेनॉलवरील आयात कर कमी करण्याची मागणी अमेरिका करत आहे. अमेरिकेतील कृषी उत्पादन जेनेटिकली मोडिफाईड (जीएम) आहेत आणि भारतात अशा प्रकारच्या कृषी उत्पादनावर बंदी आहे. त्यामुळे अमेरिकेतील जीएम कृषी उत्पादनाच्या आयातीला भारत परवानगी देऊ शकत नाही. अमेरिकेतील दुग्ध उत्पादनातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तेथे जनावरांना चाऱ्यातून मांसाहार दिला जातो. आपल्या देशात दूध हे पूर्णपणे शाकाहारी समजले जाते. कारण आपल्याकडे पशू म्हणजे गायी आणि म्हशी चारा खातात, तर अमेरिकेत तेथील गायी-म्हशींना चाऱ्यातून मांसाहार दिला जात असल्यामुळे त्यांचे दूध भारतीय मानसिकतेला पचणारे नाही. आपल्याकडच्या सर्व धार्मिक विधीत आपण दुधाचा तसेच दुग्धजन्य उत्पादनाचा वापर करीत असतो. त्यामुळे अमेरिकेतील दूध भारतात आले तर आपल्या धार्मिक भावनांना धक्का बसू शकतो आणि ट्रम्प तर यासाठी अडून बसले आहेत. त्यामुळेच भारतातील शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड करणार नाही; त्यासाठी कोणतीही किंमत मोजायची माझी तयारी आहे, असे मोदी यांना सांगावे लागले. मोदी देशाचे पंतप्रधान आहेत, तोपर्यंत शेतकऱ्यांच्या हितसंबंधांना धक्का लागणार नाही आणि देशाच्या प्रतिष्ठेला, स्वाभिमानाला आणि आत्मसन्मानाला तडा जाणार नाही, याबाबत शंका नाही. ▮

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# समता आणू समरसतेतून...

२ आणि ३ ऑगस्ट २०२५ या दोन दिवसांत श्री गुरुगोविंदसिंगजी साहित्यनगरी, भक्ती लॉन्स, मालेगाव रोड, नांदेड या सांस्कृतिक भूमीवर एक वेगळा, विचारस्पर्शी आणि हृदयाला भिडणारा साहित्यिक सोहळा साकारला गेला - २० वे समरसता साहित्य संमेलन! हे संमेलन म्हणजे केवळ व्यासपीठावर साहित्यिक भाषणांचा कार्यक्रम नव्हता, तर तो सामाजिक संवाद, बंधुत्व, समता, समरसता यांचे भावविश्व मांडणारा आणि साहित्यिक आकर्षणांनी परिपूर्ण असलेला अनुभवही होता. या साहित्य संमेलनाचा विषय होता 'नव्वदोत्तर काळातील साहित्य आणि समरसता.' या दोन दिवसांत साहित्यिक, कवी, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत आणि रसिक प्रेक्षक एकत्र आले आणि सर्जनशील, विचारप्रवृत्त चर्चांनी समाजाला संवादाच्या व समरसतेच्या माध्यमातून एक नवी दिशा दिली. पद्मश्री नामदेव कांबळे हे संमेलनाध्यक्ष होते, ज्यांची साहित्यसेवेतील निष्ठा आणि सामाजिक संवेदनशीलता दोन्हीच समर्पक ठरतात. तसेच खासदार डॉ. अजित गोपछडे हे स्वागताध्यक्ष होते, ज्यांनी आयोजनाला सामाजिक पातळीवर महत्त्वपूर्ण पाठबळ दिले. विशेष म्हणजे या संमेलनाला संत श्री बाबा बलविंदरसिंगजी यांचे आशीर्वचन लाभले. या साहित्य संमेलनात मी 'नव्वदोत्तर काळातील मराठी चित्रपट, कथा, नाटक इत्यादी माध्यमातून दलित, वंचित व महिलांचे चित्रण' या विषयावर भाषण केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला सन्मानाने जगण्याचा मंत्र दिला आणि त्या मंत्राचा जप करत आपण अथक प्रयत्नाने समाजात सन्मानाने उभे आहोत. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र म्हणजे पाठीवर हात ठेवून लढायला प्रवृत्त करणारा महामंत्र आहे. संमेलनाचे उद्घाटन भदंत डॉ. राहुल बोधी महाथेरो यांच्या हस्ते होणार होते. मात्र, समाजातील विघातक लोकांच्या धमक्यांमुळे ते संमेलनात उपस्थित राहू शकले नाहीत, अशी चर्चा सामाजिक पटलावर होत आहे. या संमेलनाला विघ्नसंतोषी लोकांनी जरी विरोध केला, नांदेडमध्ये हे संमेलन होऊ देणार नाही अशा थेट धमक्या दिल्या, तरी आयोजकांनी अतिशय सज्जनतेने याकडे दुर्लक्ष केले आणि विघातक घटकांचा विरोध न करता आपली रेष मोठी केली आणि संमेलन



व्यवस्थित व सुरक्षित पद्धतीने पार पाडले. यासाठी पोलिसांचे आभार मानावे लागेल. पद्मश्री नामदेव कांबळे यांचे अध्यक्षीय भाषण अतिशय सुरेख झाले. त्यासोबत सर्वच मान्यवर-वक्त्यांची भाषणे उत्तम झालीत. डॉ. ईश्वर नंदापुरे आणि डॉ. प्रसन्न पाटील यांच्या भाषणांमुळे एक वैचारिक बैठक प्राप्त झाली. या संमेलनात अनेक सामाजिक कार्यकर्ते व विचारवंतांनी उपस्थिती लावली. शेषराव मोरे, रमेश पांडव, गिरीश प्रभुणे, रमेश महाजन अशा दिग्गजांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला शोभा आली. संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे शिस्त आणि उत्कृष्ट आयोजन. या संमेलनाचे आयोजक समरसता साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आयोजनात कोणतीही उणीव ठेवली नाही. ट्रेन व बसमधून नांदेड येथे उतरलेल्या सर्वांचे स्वागत करण्यापासून त्यांना हॉटेलमध्ये सोडण्यापर्यंत, त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेपासून जेवण, चहापान व अगदी लहानसहान प्रत्येक गोष्टीपर्यंत कार्यकर्त्यांनी काळजी घेतली. पहाटेपासून रात्रीपर्यंत हे कार्यकर्ते आयोजन व्यवस्थित होईल याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष देत होते. ते रात्री झोप घेत होते की नाही, असाही प्रश्न आपल्या मनात येतो. कारण इतकं सुंदर नियोजन त्यांनी केलं होतं. ही ऊर्जा त्यांना कुठून मिळाली, असा प्रश्न मनात येताच उत्तरही सापडते की, समरसता या शब्दांतच किती क्षमता आहे! समाजाला समरस करण्याची ही भावनाच किती अद्भुत आहे की तुम्ही तहान-भूक विसरून तल्लीन होऊन कार्यमग्न होता.

संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे किन्नर समाजाने हे संमेलन पार पाडण्यासाठी विशेष पुढाकार घेतला. 'किन्नर विकास परिषदे'च्या माध्यमातून हा समाज मुख्य प्रवाहात विहार करत आहे. या संमेलनात त्यांनी कार्यकर्ता म्हणून आपली भूमिका बजावलीच; त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही सहभाग नोंदवला. नृत्य, कविता या माध्यमातून किन्नर समाजाने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली आणि उपस्थित लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचा सन्मान केला. त्यामुळेच हे साहित्य संमेलन समाजातील प्रत्येक स्तरातील घटकाला जोडणारे होते. 'समरसता साहित्य संमेलनात सहभागी होणाऱ्याला बुटाने हाणा' अशी हीन भाषा काहींनी वापरली. आयोजकांवर गलिच्छ आरोप केले. पण जेव्हा तुम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्ध यांच्या विचारांवर चालत असता तेव्हा या समाजविघाती प्रवृत्तींकडे लक्ष न देता समरस होऊन अविरतपणे प्रवास करत राहता.

या संमेलनाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे भाषणांमध्ये, चर्चासत्रांमध्ये आणि कविता वाचनामध्ये मूल्याधिष्ठित साहित्यिक विचारसरणीचा अभूतपूर्व प्रत्यय आला. साहित्य हे केवळ शब्दांचे जग नसून ते भावना, वेदना आणि वास्तवाचा आरसा दाखवणारे असते. या संमेलनाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना समरस करण्याची भावना प्रतिबिंबित झाली. या सर्व भाषणांमध्ये विरोधाचा सूर नव्हता तर समाज जोडणारी भावना होती. भिन्न मत, भिन्न पक्षांना एकत्र आणून संवादातून समरसता निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. 'समरसता साहित्य संमेलन २०२५' ही फक्त साहित्याची मैफिल नव्हती, तर संवादातून समाज जोडण्याची भावना, विघातक धमक्यांना आणि विरोधांना सामोरे जाण्याची शांत पण दृढ प्रेरणा, सकारात्मकतेचा निश्चय आणि समता आणण्यासाठी समरसतेचा महायज्ञ होता. या संमेलनाचा भाग होण्याची संधी मला मिळाली याबद्दल मी कृतज्ञ आहे. ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

विजय कुळकर्णी

# भूतदया अंगीकारा; पण सांभाळून

भूतदया पाळली पाहिजे, असे आपल्या संस्कृतीमध्ये म्हटले आहे. याचा विचार केला तर प्राणिमात्रांवर दया केलीच पाहिजे. म्हणजे त्यांना विनाकारण मारू नये. शिकार करू नये. प्राण्यांचा छळ होईल, अशी वागणूक देऊ नये. हे सर्व म्हणजे भूतदयाच आहे.

पण, आपण याचा वेगळा अर्थ लावून एकप्रकारे प्राणी आणि मानव या दोघांच्याही आरोग्याला अपायकारक असे कृत्य करतो. सुट्यांमध्ये आपण काही लोक जंगल सफारीला जातो. जंगलात असलेल्या विविध प्राण्यांना आपल्याकडील अन्नपदार्थ खायला घालतात. वास्तविक जंगलात किंवा अभयारण्यात वन्यजीव संरक्षण विभागाने ठिकठिकाणी जंगलातील प्राण्यांना आपल्याकडील अन्नपदार्थ खायला घालू नये, अशा सूचना असलेले फलक लावलेले असतात. तरीही आपण आपल्या मुलांना गंमत वाटावी म्हणून माकड किंवा पक्ष्यांना आपल्याकडील अन्नपदार्थ खायला देतो. तसेच, अभयारण्याच्या प्रवेशद्वारावरच आपल्याकडील अन्नपदार्थ काढून ठेवण्याची व्यवस्था केलेली असते. तरीही काही जण ते लपवून जंगलात आपल्या सोबत नेतात. ते नेण्यासाठी प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर केला जातो. त्यातील पदार्थ संपल्यावर त्या पिशव्या जंगलातच टाकून दिल्या जातात. त्या पिशव्यांना अन्नाचा वास लागलेला असतो. त्यामुळे अनेकदा जंगली प्राणी त्या पिशव्या खातात. त्यामुळे अनेकदा त्यांचा मृत्यू होतो. प्राण्यांना खाऊ घालणे. त्यांच्यासाठी घराच्या परसबागेत किंवा वऱ्हांड्यात पाण्याची व्यवस्था करणे यामागची भावना चांगली आहे. उन्हाळ्यात अनेक संस्था-संघटना पक्ष्यांसाठी बर्ड फिडिंग किंवा पाणी पात्राचे वितरण करतात. पशुपक्षी वाचावे, हा त्यामागचा त्यांचा उदात्त उद्देश असतो. कारण पक्ष्यांचे खाद्य मुख्यतः कृमी, कीटक, अळ्या हेच असते. पक्षी वाचले तर या कीटकांपासून पिकांचे होणारे नुकसान टाळता येते. पक्षी शेतातील कृमी-कीटक खातात. शेती आणि शेतकऱ्यांसाठी ते लाभदायकच ठरते. सकाळी घराच्या अंगणात आपण ठेवलेल्या पाणीपात्र आणि धान्य खाण्यासाठी पक्षी जमल्यामुळे त्यांचा किलबिलाट कानाला आल्हाददायक वाटतो. त्यामुळे मन प्रसन्न होते. सकाळी सकाळी पक्ष्यांचा किलबिलाट ऐकल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. पण, काही पक्ष्यांपासून मानवाला गंभीर आजार जडण्याची शक्यता देखील असते. आपल्या घराच्या भोवती कबूतर जास्त संख्येत वास्तव्य करीत असतील तर त्यापासून धोका निर्माण होण्याची शक्यता असते. कारण, त्यांच्या शरीरातून एक विशिष्ट प्रकारचा भुगा (पावडर) हवेत पसरते. त्यामुळे मनुष्याला श्वसनाचे आजार जडण्याची शक्यता असते. कुत्र्यांपासूनही मानवाला अपाय होऊ शकतो. कुत्रा इमानदार प्राणी असल्याने आपण त्यांना पाळतो. पण, कुत्र्यांपासून रेबीज हा आजार होण्याची शक्यता असते. लेप्टोस्पायरोसिस हा आजार कुत्र्यांच्या मूत्रातून पसरणाऱ्या जीवाणूंमुळे होतो. खरुज हा त्वचारोग होऊ शकतो. खामगावात तीन महिन्यात भटक्या कुत्र्यांनी ५८ जणांना चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. निसर्गाने प्रत्येक प्राण्याला जन्म देताना त्याचे अन्नदेखील निर्माण केले आहे. वन्यप्राण्यांना आपण खातो ते धान्य किंवा अन्नपदार्थ खाऊ घालण्याची गरज नसते. माणसाने जास्त जेवण केले की अजीर्ण होते. त्यामुळे पोटाचे विकार जडतात. त्याचप्रमाणे पक्ष्यांना एकच धान्य खाऊ घातले तर त्यांनादेखील ते पचत नाही. खरे म्हणजे आपण खातो ते धान्य त्यांना केवळ १० ते २० टक्केच हवे असते. त्यांचे खाद्य ते स्वतःच शोधतात. कृमी-कीटक खाऊन ते जगतात. त्यांना जर आयते खाद्य मिळू लागले तर त्यांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होईल. आज जंगलात किंवा शेतशिवारात हरणांचे कळप, माकडांच्या टोळ्या दिसतात. हरणाचा कळप एखाद्या शेतात घुसला की पिकांचे नवीन कोंब फस्त करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. परंतु, शेतात बाराही महिने पीक नसते. त्यामुळे त्यांना त्यांचे अन्न शोधावे लागते. आपण त्यांना जर खाऊ घातले तर त्यांचे आयुष्यमान वाढून त्यांची संख्या भरमसाट वाढेल. एकंदर विचार केला तर प्राणी, पशू, पक्षी हे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे त्यांचे रक्षण आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांच्यापासून मानवालादेखील अपाय होऊ शकतो. मानवी जीवन धोक्यात येऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या मनात भूतदया असलीच पाहिजे. मुक्या प्राण्यांचा कोणी छळ करीत असेल तर त्याविरुद्ध आवाज उठवलाच पाहिजे. वन्यप्राण्यांची शिकार करू नये आणि कोणालाच करू देऊ नये. पिसाळलेला कुत्रा, नरभक्षी वाघाचा बंदोबस्त केलाच पाहिजे. प्राणिमात्रांवर दया करताना ते आपल्या जिवावर उठणार नाहीत आणि आपल्यापासूनही त्यांच्या जिवाला धोका पोहोचणार नाही, याचे तारतम्य राखून प्रत्येकाने भूतदया अंगीकारावी. ▮

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# गोंधळलेले गोंधळी!

रोज उठायचं आणि रोज सकाळी सकाळी निराधार आरोप करायचे अशी सवय जडलेल्या दोन व्यक्ती आपल्या समाजात वावरत आहेत. एकाचा देशात तर दुसऱ्याचा राज्यात वावर नव्हे उपद्व्याप चालला आहे. तेच ते अर्थहीन आरोप करताना यांना कंटाळादेखील येत नाही. याचेच नवल आहे. सातत्याने अपयश पदरी पडत असल्याने कदाचित मानसिक संतुलनात फरक पडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, देशात वावर असलेल्या व्यक्तीकडे बरेच विचारी आणि समज असलेले लोक आहेत. त्यांच्याकडून माहिती घेतल्यास अशा तोंडावर आपटण्याच्या घटना किमान टळतील. प्रत्यक्षात दोन्ही उपद्व्यापी लोक आणि त्यांचे नेते, कार्यकर्ते यांच्या लक्ष्यावर निवडणूक आयोग, न्यायालये, केंद्रीय यंत्रणा असतात. हे करत असताना सगळी मंडळी कोणतेही पुरावे देणार नाहीत. न्यायिक प्रक्रिया अवलंबणार नाही, वैधानिक मार्ग स्वीकारणार नाही. केवळ रस्त्यावर उतरून छाती तेवढी बडवणार. साहेबांना देशात कोणी विचारत नाही म्हणून ते अमेरिकेत जाऊन ऊर बडवतात. आता नुकतीच इंडिया आघाडीची बैठक झाली यातदेखील पुढील निवडणुकांची रणनीती ठरवायची सोडून पुन्हा एकदा ईव्हीएम आणि मतदारयादी घोटाळ्याचा राग आलापला. त्यामुळे धन्य तो विरोधी पक्ष आणि धन्य त्यांचे नेते. असेच म्हणावे लागेल.

यांच्या बौद्धिक दिवाळखोरीची अनेक उदाहरणे आहेत. रोगावर उपचार करण्याऐवजी, बाकी साऱ्या गोष्टी हे लोक करतात. मात्र, रोग बरा व्हावा यासाठी प्रयत्न करावे असे यांना कधीही वाटले नाही. त्यामुळे निवडणुका जिंकण्यासाठी काय करावे आणि निवडणुका आपण सतत का हरत आहोत? याची कारणमीमांसा करावी याचा प्रश्नच उद्भवत नाही. यांच्यातला बुद्धिभेद कधी, संपेल असे वाटत नाही. नुकताच एक आरोप केला जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा घेत नाही.

निवडणुका घ्यायला घाबरत आहे. त्याचवेळी निवडणूक आयोगात आपली माणसे बसवून ईव्हीएम घोटाळा करून भाजपा निवडणुका जिंकते, असा दुसरा आरोप केला जात आहे. यापूर्वी महाराष्ट्रात ईव्हीएम घोटाळा



करून भाजपा जिंकली असा आरोप सातत्याने केलाच जात असतो. यातून यांच्या बुद्धीची प्रचीती येते. कुठल्यातरी एका गोटीवर ठाम राहिले पाहिजे. परस्परविरोधाभासी असे वक्तव्य हे लोक स्वतःच करतात. भाजपा जर ईव्हीएम घोटाळा करूनच निवडणुका जिंकते तर, मग त्यांना निवडणुकांची भीती कसली? ते तुम्हाला आणि निवडणुकांना का घाबरतील?, त्यांचा तर विजय पक्काच आहे. प्रशासकाच्या माध्यमातून लूट करण्यापेक्षा स्वतःच्या कार्यकर्त्यांना सोयीचा मार्ग उपलब्ध करून देण्यात भाजपाचा तोटा कुठे आहे? मुळात कुठलीतरी एक गोष्ट शक्य होऊ शकते. ती म्हणजे भाजप पराभवाच्या भीतीने निवडणूक आयोगाला हाताशी धरून निवडणुका लांबणीवर टाकत असेल. तर तो ईव्हीएम मॅनेज करत नाही असा त्याचा सरळसोपा अर्थ होतो. आणि ईव्हीएम मॅनेज करत असेल तर मग निवडणुका लांबणीवर टाकण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे गोंधळ मांडलेल्या या गोंधळींना स्वतःचा गोंधळ दूर करून नेमकं म्हणायचं काय ते स्पष्ट करणं गरजेचं आहे.

ईव्हीएम मशीन म्हणजे जगातल्या लोकशाहीतील सर्वांत मोठा घोटाळा असल्याचा आणखी नवा एक आरोप केला जात आहे. खरं तर निवडणूक आयोगाने जेव्हा ईव्हीएम हॅक करून दाखविण्याचे आव्हान दिले तेव्हा ईव्हीएमवर आगडोंब उसळवणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाने आव्हान स्वीकारले नाही. नुकतेच बिहार मतदारयादी अद्ययावतीकरण सुरू असताना निवडणूक आयोगाने काही आक्षेप असल्यास कळविण्यास सांगितले, तेव्हा बिहारमध्ये आयोग घोळ करत असल्याचा डांगोरा पिटणाऱ्या विरोधी पक्षांपैकी एकानेही अजूनपर्यंत एकही आक्षेप घेतलेला नाही. केवळ प्रसारमाध्यमांमधून आणि समाजमाध्यमांमधून समाजात संभ्रम पसरविण्यासाठी खोटे आरोप करत हे लोक फिरताना दिसतात. प्रत्यक्षात जर ईव्हीएम, निवडणूक आयोग आणि भाजपाच्या भूमिकेसंदर्भात जर या लोकांना खात्रीलायक माहिती असेल तर, मग विरोधकांना अर्थात ज्यांना भाजपा ईव्हीएम घोटाळा करते अशी खात्री असलेल्यांनी निवडणुकांच लढू नये.

जेव्हा तुम्हाला जिंकूच दिले जाणार नसेल तर, उगाच निवडणुका लढून पैसा आणि शक्ती दोन्ही खर्च करणे व्यर्थ आहे. पण नाही हे निवडणुका लढणार यांच्या मस्तीने ते हरणार आणि मग ईव्हीएमच्या, भाजपाच्या, निवडणूक आयोगाच्या नावावे रुदाली करणार. सध्या काम नसल्याने यांचा हा धंदा झाला आहे. काहीही केलं यांनी तरी यातदेखील विरोधाभास आहे. प्रत्येक निवडणुकीत यांचे काही लोक निवडून येतात, याचा अर्थ या लोकांनी ईव्हीएम हॅक करून विजय मिळवलाय का? असा प्रश्न निर्माण होतो? मग तेथील ईव्हीएम का हॅक केली नाही भाजपाने, वरुण सरदेसाई, आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, सुनील राऊत, सुनील प्रभू त्यातल्यात्यात एकनाथ शिंदेंना धोका देणारे नितीन देशमुख यांच्यासह एकूण २० आमदार ठाकरेंच्या पक्षाचे, काँग्रेसच्या, शरद पवारांच्या निवडून आलेल्या आमदारांनी कसा विजय संपादित केला? या प्रश्नाचे उत्तर यांच्याकडे असेल तर त्यांनी द्यावे...

मुळात स्वतःला काहीही करता येत नाही, सपशेल अपयशी झालो आहोत. हतबल आहोत हे माहिती असल्याने, आपल्या अपयशाचे खापर कोणाच्यातरी माथ्यावर फोडत राहून आपलीच पाठ थोपटून समाधान मानत राहण्याचा हा केविलवाणा प्रयत्न, हे लोक करत राहतात. यांच्या चेहऱ्यांवर आणि यांच्या कृत्यांवर देशातील आणि राज्यातील जनतेला वीट आलाय्. विरोधकांच्या चाललेल्या या बालिशपणामुळेच की काय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोंधळ्यांच्या मेंदूची चीप चोरीला गेली आहे, हार्डडिस्क चोरीला गेली आहे असे म्हणत असावेत. ▮

९२७०३३३८८६

### रक्षाबंधन : भाऊ-बहिणीच्या पवित्र बंधनाचा सण

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या पवित्र बंधनाचा सण मानला जातो. रक्षाबंधन या दिवसाला नारळी पौर्णिमा असेही संबोधले जाते. रक्षाबंधन सण आपल्यात कौटुंबिक आणि सामाजिक एकता वाढवतो. या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधते. सख्ख्या बहिणीने सख्ख्या भावाला राखी बांधावीच पण एखाद्या बहिणीने दुसऱ्या भावाला राखी बांधल्यास त्यामध्ये शील रक्षणाची जबाबदारी येते. रक्षाबंधन म्हणजे समाजात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. रक्षाबंधन म्हणजे भावाने बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी घेणे, रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या शुद्ध प्रेमाचा वाहता निर्झर भाऊ आणि बहीण परस्पर प्रेरक, पोषक आणि पूरक आहेत हा संदेश देणारा हा उत्सव भारतीय संस्कृतीची अमूल्य देण आहे.

रक्षाबंधन केवळ बहीण-भावाच्या नात्याचे प्रतीक नाही, तर सामाजिक बांधिलकीचे आणि परस्परांच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्याचेही स्मरण करून देणारा सण आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाला राखी बांधून त्याच्याकडून संरक्षणाचे वचन घेते आणि भाऊ देखील आपल्या बहिणीच्या … सुरक्षिततेसाठी वचनबद्ध होतो. हे नाते केवळ वैयक्तिक न राहता, समाजातील सर्व लोकांच्या परस्पर विश्वास आणि एकोप्याचे प्रतीक आहे. रक्षाबंधन फक्त भावंडांमध्येच नाही, दतर तो आपले कुटुंब, समाज आणि राष्ट्राशी असलेल्या प्रेम व एकतेचेही प्रतीक आहे. हा सण एकत्रित कुटुंबसंस्थेचे महत्त्व आणि सामाजिक बांधिलकीचेही स्मरण करून देतो. या सणाने सामाजिक बंध आणि नात्यांमधील प्रेम वृद्धिंगत होते, त्यामुळेच रक्षाबंधनाला भारतीय संस्कृतीत खूप महत्त्व आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात देखील रक्षाबंधनाचा सण आपली परंपरा, सांस्कृतिक मूल्ये आणि बंधुभाव जपण्याचं महत्त्व कायम ठेवतो. हा सण फक्त भिंतींवर राखी टांगण्याचा नाही, तर आपुलकी, प्रेम आणि संरक्षणाची भावना व्यक्त करण्याचा देखील एक शुभ दिवस आहे. तसेच, डिजिटल युगात सोशल मीडियाच्या मदतीने राखी पाठवणे, व्हिडीओ कॉलद्वारे भावना व्यक्त करणे यासारख्या नवनवीन मार्गांनीही हा सण साजरा केला जात आहे. त्यामुळे, तंत्रज्ञान आणि परंपरेचे सुंदर मिलन या सणाला अधिक खास बनवत आहे. हा सण भाऊ-बहिणीच्या नात्याच्या प्रेम, विश्वास आणि सुरक्षा यांचे प्रतीक आहे. जर आपल्याला भारतीय संस्कृतीचे रक्षण करावयाचे तर जुन्या पद्धती अनुसार सण-उत्सव साजरे करायला हवे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेस आणि सुविधा

महाराष्ट्रातील अंदाजे ८०० किलोमीटर दूर असलेली दोन मोठी शहरे पुणे ते नागपूर प्रवास करणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. रेल्वे गाड्या तसेच असंख्य खाजगी बसेस असूनही प्रवास साधने अपुरीच वाटतात. ऐनवेळी प्रवासाला जायचं असेल तर रेल्वेचे तिकीट मिळणे अशक्य होते. रेल्वेचा अंदाजे १५ तासांचा प्रवास बघता दोन्ही शहरातल्या प्रवाशांनी अति तीव्र गतीने चालणारी वंदे भारत एक्सप्रेस सुरू करावी अशी मागील दोन वर्षांपासून मागणी होती आणि आता रेल्वेमंत्र्यांनी वंदे भारत सुरू करण्याची घोषणा केली आहे. समाज माध्यमात ही बातमी वाचताच अनेकांना आनंद झाला, मात्र दोन्ही शहरातून गाडी सुटण्याची वेळ पाहून गाडी आपल्याला किती सोयीची आहे याच्यावर प्रश्न पडला. या गाडीला शयिका (स्लीपर) ऐवजी बसून प्रवास करण्याचे आसन आहे. दोन्हीकडून गाडीचा प्रवास दिवसभराचा बारा तासांचा आहे. या प्रवासात नोकरी करणाऱ्या … तरुणांची संख्या जास्त असते. पुण्याहून नागपूरला येणे व परत जाण्यास दोन दिवसांच्या जादा सुट्या मोजाव्या लागतील. तसेच वयस्कर लोकांना बारा तास प्रवास बसून करायचा म्हणजे शारीरिक दुखणे होय. दोन शहरातला प्रवास करण्यासाठी लोक रात्रीच्या प्रवासाला जास्त पसंती देतात. रेल्वेने प्रवासकाळ कमी करण्याचा प्रयत्न करावा. या गाडीने प्रवास करणे लोकांसाठी शेवटचा पर्याय ठरू शकतो. दोन शहरात जाण्यासाठी अजून एका गाडीची भर पडली याचे मात्र समाधान आहे.

**अमोल पाठक**/९५४५८९८४४६

●● ●●

### ट्रम्प यांचा खटाटोप

आतापर्यंत भारत हा गरीब देश आहे. गुलामगिरी आणि मागासलेपण यामुळे देश चालविण्यासाठी अमेरिकेचे वर्चस्व मानून सवलती पदरात पाडून घेण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिले होते. त्यावेळी अमेरिकेतील 'मिलो' गहू आणून देशातील जनतेला जगविले जात होते. परंतु भारतातील राजकीय सत्ता बदलानंतर यात आमूलाग्र बदल दिसू लागले. जागतिक स्तरावर शांतता आणि विकासाचे मॉडेल भारताचे पंतप्रधान मोदी यांनी उभे केले. कोणत्याही बाहेरील राष्ट्राचे, कोणत्याही … एका देशाचे वर्चस्व नको, कोणाच्याही दबावाखाली झुकणार नाही असे कणखर निर्णय घेण्याचे धोरण ठामपणे जगासमोर ठेवण्यात आले. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अशा योजनांमुळे भारताची अर्थव्यवस्था बळकट झाली. जगात याची सर्वत्र दखल घेण्यात आली. त्यातच ब्राझीलच्या राष्ट्रपतींनी ब्रिक्स देशांनी वेगळे चलन आणण्याचे सुतोवाच केले. या ऐतिहासिक बदलामुळे अमेरिकन डॉलरचे महत्त्व कमी होईल. जगातील आपले वर्चस्व कमी होणार असे अमेरिकेला वाटू लागले. त्यातच रशिया, चीनसारखी बलाढ्य सत्ता भारताच्या भूमिकेशी सहमत झाली. या सर्व जागतिक बदलामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व्यथित झाले. त्या नैराश्यातून भारतातील आयातीवर एकूण ५० टक्के शुल्क लावण्याचे घोषित करण्यात आले. यामुळे प्रत्येक देशाने आपल्या देशात तयार होणाऱ्या वस्तूंनाच प्राधान्य देऊन गरजा भगवाव्यात असा संदेश सर्वत्र पोचला आहे. ▮

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हर घर तिरंगा मोहीमेचे तीन टप्प्यात विविध उपक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ ऑगस्ट -**

नागरिकांत देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढविणे यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार लातूर शहरात 'हर घर तिरंगा' मोहीम राबविण्यात येणार आहे.१५ ऑगस्ट पर्यंत एकूण तीन टप्प्यात ही मोहीम राबविली जात आहे.

भारताच्या राष्ट्रध्वजासोबत वैयक्तिक बंध निर्माण करण्यावर हा उपक्रम आधारित आहे. २०२२ पासून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून राबविली जाणारी ही मोहीम आता लोक चळवळ बनलेली आहे.

या अंतर्गत लातूर शहरात तीन टप्प्यात विविध उपक्रम होत आहेत. पहिल्या टप्प्यात शुक्रवार दि.८ रोजी सिद्धार्थ सोसायटीतील बौद्ध विहार येथे रांगोळी स्पर्धा संपन्न झाली. एलआयसी कॉलनी येथे रांगोळी स्पर्धा व प्रतिज्ञा तर मनपा मुख्यालय तिरंगा थीमवर आधारित वस्तू प्रदर्शन व विक्री सुरू आहे.

दुसऱ्या टप्प्यात सोमवार दि.११ ऑगस्ट रोजी मनपाच्या सर्व १६ शाळांमध्ये शिक्षण विभागाच्या वतीने तिरंगा रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### क्रॉस कंट्री स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालयाचा विजय झंकार

**अहमदपूर, दि.९ ऑगस्ट -**

विचार विकास मंडळ, अहमदपूर संचलित महात्मा गांधी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी बी-झोन क्रॉस कंट्री स्पर्धेत अभिमानास्पद कामगिरी करत पहिला, तिसरा व उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महाराष्ट्र-उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने ५ ऑगस्ट २०२५ रोजी उदगीर येथे पार पडलेल्या १० किमी धावण्याच्या बी-झोन क्रॉस कंट्री स्पर्धेत विठ्ठल राठोडने प्रथम क्रमांक, संविधान ढवळेने तिसरा क्रमांक, तर इम्रान तांबोळीने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. या तिघा खेळाडूंनी विद्यापीठाच्या आंतर-झोन स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. किशनराव बेंडकुळे, सहसचिव सुरेशराव देशमुख, प्राचार्य डॉ.व्ही.पी. पवार, तसेच क्रीडा विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. विनोद माने यांनी खेळाडूंचा सत्कार करून अभिनंदन केले.



### पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय देवणी येथे रवींद्रनाथ टागोर स्मृतिदिन साजरा

**वलांडी, दि.९ ऑगस्ट -**

पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय देवणी येथे इंग्रजी विभागाच्या वतीने रवींद्रनाथ टागोर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.व्ही.टी. नाईक यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या प्रतिमेचे पूजन केले आणि त्यांच्या जीवनानुभवावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा.डॉ. कांत जाधव व प्रो. डॉ. जानअहेमद के.जे. होते. डॉ. नागलगावे बी.एन., डॉ.बन, प्रा. राठोड यु.एस., प्रा.डॉ. अनिल रेड्डी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विषयाचे विभाग प्रमुख प्रा.एस.टी. हैबतपुरे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. धुळे आर.डी. यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### कांचनताई जवळगेकर यांचे निधन

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**

लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांच्या पत्नी कांचनताई जवळगेकरयांचे ८ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता हृदयविकाराच्या धक्क्याने लातूरच्या गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्या ६४ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली एक डॉक्टर व एक शिक्षिका, एक मुलगा असा परिवार आहे. कांचन जवळगेकर ह्या हरंगुळ बु. येथील जि.प. शाळेवर केंद्र प्रमुख म्हणून सेवा करून निवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वा. लातूर येथील खाडगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## विविध मागण्यासाठी अहमदपूरमध्ये उद्या आक्रोश आंदोलन व गाढव मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.९ ऑगस्ट -**

अहमदपूर तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, सम्राट मित्र मंडळाच्या वतीने सोमवारी (११ ऑगस्ट) उपजिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश आंदोलन व गाढव मोर्चा काढण्यात येणार आहे. याबाबतची माहिती युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

प्रसिद्धीपत्रकात म्हटल्याप्रमाणे, गायरान ताब्यात शेती करणाऱ्यांना जमीनपट्टे देणे, उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी, दलित व इतर समाजासाठी स्मशानभूमीची व्यवस्था, निराधार, अपंग, परित्यक्ता यांना नियमित अनुदान, उत्पन्न प्रमाणपत्राच्या मर्यादेत वाढ, घनकचरा व्यवस्थापन कर्मचाऱ्यांचा १७ महिन्यांचा थकीत पगार, अतिक्रमण धारकांच्या प्रधानमंत्री आवास फॉर्मची नोंद, शासन निधीचे समान वाटप, एमआयडीसी परिसरातील भटक्या-विमुक्तांना घरकुल, ग्रामीण रुग्णालयातील ट्रॉमा केअर सेंटर व ब्लड स्टोरेज सेंटर सुरू करणे, शाळांना संरक्षण भिंत, इदगाह मैदानासाठी हायमास्ट लाईट, रमाई घरकुल अनुदानात वाढ, बसस्थानकासमोरील शौचालय सुरू करणे, अन्यायकारक मालमत्ता नोंदणी शुल्क रद्द करणे, बेघरांचा सर्व्हे करून घरे मंजूर करणे, सामाजिक न्याय विभागाचा निधी परत मिळवणे अशा मागण्यांसह अनेक मुद्द्यांवर हा मोर्चा होणार आहे.

तसेच, तालुक्यातील परचंडा, गंगाहिप्परगा, उजना, सिंदगी खुर्द, सुमठाणा, गूगदळ, हगदळ, लांजी, पाटोदा, तीर्थ, किनी कद्दू, मूळकी, वंजारवाडी, सांगवी (उमरगा) आदी गावांतील गायरान अतिक्रमण धारकांचे पीक पंचनामे करून नोंद घेणे, धानोरा खुर्द येथील बौद्ध-मातंग समाजासाठी स्मशानभूमी शेड, सिद्धार्थ नगर येथील आनंद बुद्ध विहारासाठी भूसंपादन व सामाजिक सभागृहाचा निधी, तसेच शिरूरताजबंद येथील अजहर शेख यांच्या शौर्याचा राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्याच्या मागण्या देखील करण्यात आल्या आहेत.



या महत्त्वपूर्ण आंदोलनाबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता असून, प्रशासनाची भूमिका काय राहते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## पोलिस नाईक ५ हजारांची लाच घेताना पोलिसांच्या जाळ्यात




**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.९ ऑगस्ट -**

शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक दत्तात्रय उद्धव चामे यांना ५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. तक्रारदाराच्या मुलींची नावे गुन्ह्यातून वगळणे व इतर प्रकरणांत मदत करण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

तक्रारदाराचे पती व त्यांच्या सावत्र भावामध्ये जमिनीच्या वादातून मारामारी झाली होती. या प्रकरणी दोन्ही पक्षांवर गुन्हे दाखल झाले होते. तक्रारदाराच्या तीन मुलींचीही नावे गुन्ह्यात होती. त्यांची नावे वगळण्यासाठी व १०७ च्या कारवाईत मदत करण्यासाठी चामे यांनी सुरुवातीला २० हजार रुपयांची मागणी केली होती.

तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार दिल्यानंतर पडताळणी करण्यात आली. पडताळणीत आरोपीने 'तुमच्या खुशीने व मनाने काय द्यायचे ते द्या' असे सांगत लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्यानुसार ६ ऑगस्ट रोजी एसीबीच्या पथकाने सापळा रचून तहसील कार्यालयासमोर चामे यांना तक्रारदाराकडून ५ हजार रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप पालवे व अपर पोलिस अधीक्षक डॉ. संजय तुंगार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## स्वत:ची क्षमता ओळखून स्पर्धा परीक्षेची तयारी करा : सागर वरंडेकर



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ ऑगस्ट -**

विद्यार्थ्यांनी स्वतःमधील क्षमता ओळखून संयमाने आणि परिश्रमपूर्वक प्रयत्न केल्यास यश मिळवणे शक्य आहे, असे प्रतिपादन देवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांनी केले.

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के होते. उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे, लातूर येथील राजमुद्रा स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक प्रा. महेश मोरे, माजी विद्यार्थी व दिग्दर्शक संतोष राम, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सदस्य प्रा. मनोहर पटवारी, डॉ. रामप्रसाद लखोटिया, डॉ. रेखा रेड्डी, महादेव नौबदे यांची उपस्थिती होती.

वरंडेकर म्हणाले, धाडस, धीर आणि दृष्टी असली की यशाची सृष्टी साकार होते. लक्ष अचूक ठेवल्यास अपयश येत नाही.

किती तास अभ्यास केला यापेक्षा काय वाचले हे महत्त्वाचे असून सातत्य आणि प्रबुद्धतेने अभ्यास केल्यास यश निश्चित मिळते.

यावेळी प्रा. मोरे यांनी स्पर्धा परीक्षेत सातत्याचे महत्त्व अधोरेखित केले.

दिग्दर्शक संतोष राम यांनी साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचा अंगीकार करून आव्हानांवर मात करण्याचे आवाहन केले.

समारोपात प्राचार्य डॉ. मस्के यांनी स्पर्धा परीक्षेत प्रामाणिक राहून स्वतःशीच स्पर्धा करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक प्रा.डॉ. गौरव जेवळीकर यांनी, सूत्रसंचलन प्रा.डॉ. एस.ए. मुळे यांनी तर आभार प्रा.डॉ.एस.एन. घोंगडे यांनी मानले.

## लोकनेते स्व. मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सोमवारी अनावरण

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.९ ऑगस्ट -**

लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या लोकनेते, माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते सोमवार, दि.११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. ही माहिती भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

भव्य आणि आकर्षक स्वरूपात उभारण्यात आलेला हा पुतळा शासकीय जागेत बसवण्यात आलेला असून, लातूरमध्ये बसविण्यात आलेला हा पुतळा राज्यातील पहिलाच असल्याचे कराड यांनी सांगितले. या अनावरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले असतील. कार्यक्रमास राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, पर्यावरण मंत्री ना. पंकजा मुंडे, सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, माजी कृषीमंत्री आ. धनंजय मुंडे, माजी युवक कल्याण व क्रीडामंत्री आ. संजय बनसोडे, आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा आ. अभिमन्यू पवार, मराठवाडा शिक्षक मतदारसंघ आ. विक्रम काळे, राज्य कृषी मूल्य आयोग अध्यक्ष पाशा पटेल, गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ अध्यक्ष गोविंदा केंद्रे, भाजप नेत्या अर्चना पाटील चाकूरकर, शिवसेना संपर्कप्रमुख ॲड. बळवंतराव जाधव, भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष अफसर शेख, शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, रिपाई जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांच्यासह महायुतीचे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



जिल्ह्यातील भाजप, महायुतीतील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मुंडे यांच्यावर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आ. रमेश कराड यांनी केले आहे.

## १२ ऑगस्ट रोजी धाराशिव येथे पत्रकारांसाठी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ ऑगस्ट -**

जिल्हा माहिती कार्यालय, धाराशिवतर्फे जिल्ह्यातील माध्यम प्रतिनिधींसाठी पत्रकार कार्यशाळेचे आयोजन मंगळवार, दि.१२ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, धाराशिव येथे करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते होणार असून, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व पोलीस अधीक्षक शफकत आमना प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेत जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे माध्यमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर, तर परभणी येथील प्रा. दीपक रंगारी वृत्तपत्रामध्ये प्रमाण लेखनाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच पत्रकारांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती विभागीय माहिती कार्यालय, लातूरचे सहायक संचालक डॉ. श्याम टरके देतील.

## उत्तम आहार नियोजनातून शेळीपालन किफायतशीर करा : डॉ. बारबुद्धे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ ऑगस्ट -**

शेळीपालनामध्ये गोठा, आरोग्य आणि आहार व्यवस्थापन या तीन घटकांचा योग्य समन्वय साधल्यास व्यवसाय किफायतशीर होतो तसेच उत्पादनाचे मूल्यवर्धन केल्याने उत्पन्न वाढते, असे प्रतिपादन राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैदराबादचे संचालक डॉ. सुखदेव बारबुद्धे यांनी केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीरमार्फत अनुसूचित जातीतील पशुपालकांसाठी आहार व्यवस्थापनातून किफायतशीर शेळीपालन व्यवसाय या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण व जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

प्रशिक्षणात लातूर जिल्ह्यातील १५० पशुपालकांनी सहभाग घेतला. उद्घाटन डॉ. बारबुद्धे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. नंदकुमार गायकवाड होते. पाहुणे म्हणून डॉ. अनिल भिकाने, डॉ. योगेश गाडेकर, डॉ. अशोककुमार देवांगरे, डॉ. प्रफुल्ल पाटील उपस्थित होते.

प्रशिक्षणात शेळ्यांचे आहार नियोजन, चारा उत्पादन, आझोला व हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान, हिरव्या चाऱ्यापासून मुरघास निर्मिती, आरोग्य व्यवस्थापन, लसीकरण व जंतनिर्मूलन या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच विविध चारा पिके व पशुखाद्य घटकांचा स्टॉलही भरविण्यात आला. उपस्थित सर्व पशुपालकांना कीटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मत्स्यगंधा पाटील यांनी, तर आभार डॉ. राम कुलकर्णी यांनी मानले. आयोजनात महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## पदविका अभियांत्रिकी प्रवेशासाठी तंत्रनिकेतनच्या रिक्त जागांसाठी उद्या लातूरात समुपदेशन फेरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ ऑगस्ट -**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या २०२५-२६ प्रवेश प्रक्रियेनुसार प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील रिक्त जागांसाठी संस्था स्तरावरील समुपदेशन फेरी दि.१० ऑगस्ट रोजी धाराशिव तर दि.११ ऑगस्ट रोजी लातूर शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये होणार आहे. सदरील नोंदणी सकाळी ८ ते ११ या वेळेत केली जाणार आहे.

१० ऑगस्ट रोजी धाराशिव येथे, ११ ऑगस्ट रोजी लातूर येथे फेरी पार पडेल. ११ ऑगस्ट रोजी लातूर येथे धाराशिव व निवासी महिला तंत्रनिकेतन लातूर यांची क्लस्टर फेरी होईल. sp व NON-CP नोंदणी केलेले विद्यार्थीच पात्र ठरणार असून निवड झालेल्यांनी आवश्यक मुळ कागदपत्रांसह त्याच दिवशी प्रवेश निश्चित करणे बंधनकारक आहे.

रिक्त जागांची माहिती संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर एक दिवस आधी प्रसिद्ध केली जाईल, असे धाराशिव तंत्रनिकेतन धाराशिवचे प्रवेश समिती प्रमुख लहु माधवराव माने यांनी सांगितले आहे.

## रोटरी क्लबच्या वतीने अंध, दिव्यांगांना देवदर्शनासाठी अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ ऑगस्ट -**

सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने अंध व दिव्यांग व्यक्तींना देवदर्शन सहलीसाठी पंधरा हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले.

यात्रा आणि देवदर्शन करण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे.

श्रावण मासाचे औचित्य साधून अनेक मंडळी विविध धार्मिक स्थळांना भेटी देऊन दर्शनासोबतच पर्यटनाचाही आनंद घेताना दिसतात. या आनंदापासून अंध आणि दिव्यांग व्यक्ती वंचित राहू नयेत, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने अंध व दिव्यांगांना देवदर्शन सहलीसाठी पंधरा हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले. या सहकार्याबद्दल अंध-दिव्यांगांनी शतशः ऋण व्यक्त केले आहेत.

याप्रसंगी रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने रोटरी क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, लक्ष्मीकांत गौड, गिरीश ब्याळे, मिलिंद आंबेकर, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, स्वामी, मुंडे, साहेबराव मोरे, गिरीश गारटे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यास कायमस्वरूपी कृषी अधिकारी : शेतकऱ्यांत समाधान

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.९ ऑगस्ट -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कृषी कार्यालयाला अखेर कायमस्वरूपी तालुका कृषी अधिकारी मिळाले आहेत. गुरुवारी संजयकुमार ढाकणे यांनी पदभार स्वीकारला असून, यानिमित्त कार्यालयात त्यांचा सत्कार प्रभारी तालुका कृषी अधिकारी बालाजी राजवाडे यांच्या हस्ते करण्यात आला.



या कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी बालाजी राजवाडे, उपकृषी अधिकारी सुहास राऊत, संतोष सारगे, विवेकानंद साळुंके, कृषी अधिकारी शिवाजी ताराळकर, आत्मा प्रकल्पाचे बालाजी तिवडे, राहूल जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी रविभुषण स्वामी, तुकाराम कांबळे, अनिल म्हेत्रे, सारिका शिंदे, वर्षा भोंग आदी उपस्थित होते.

लक्ष्मण खताळ यांची बदली झाल्यानंतर तालुका कृषी अधिकारीपदाची जबाबदारी प्रभारी म्हणून बालाजी राजवाडे सांभाळत होते. आता कायमस्वरूपी अधिकारी रुजू झाल्याने शेती विकासाशी संबंधित विविध योजना, कार्यक्रमांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत असून, शेतकऱ्यांतून समाधानाचा सूर उमटत आहे.



**लातूर :** शहरातील मुक्तांगण इंग्लिश स्कुलमध्ये राखी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील लहान मुला-मुलींना एकमेकांना राखी बांधून हा सण साजरा केला.

धाराशिव
दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंना शेतरस्त्यांच्या कामासाठी निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.९ ऑगस्ट -**
जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनसंवाद मेळाव्यात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना वाशी तालुक्यातील भाजपा महिला कार्यकर्त्या व 'बेटी बचाव बेटी पढाव' तालुका प्रमुख उज्वला आनंद पाटील यांनी शेतरस्त्यांच्या कामांसाठी निवेदन सादर केले.

भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या माध्यमातून देण्यात आलेल्या निवेदनात बोरी ते चव्हाण वस्ती शेत रस्ता (१० लाख रूपये), बोरी ते पाटील वस्ती शेत रस्ता (१० लाख रूपये) आणि बोरी ते शिंदे वस्ती शेत रस्ता (१२ लाख रूपये) अशी एकूण ३२ रूपये लाखांची कामे मंजूर करण्याची मागणी करण्यात आली.

या कामांना मंजुरी मिळाल्यास बोरी गावातील नागरिकांना कायमस्वरूपी रस्त्याची सुविधा उपलब्ध होणार असून गाव आदर्श गावाच्या दिशेने वाटचाल करेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला. गावाच्या विकासकामांसाठी सातत्याने पुढाकार घेतल्याबद्दल व सहकार्य दिल्याबद्दल त्यांनी जिल्हाध्यक्ष कुलकर्णी यांचे आभार मानले.



### संक्षिप्त वृत्त...



### नवोदय विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**तुळजापूर, दि.९ ऑगस्ट -**
पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात दि.९ ऑगस्ट शनिवार रोजी रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सर्वप्रथम पृथ्वीराज कांबळे या विद्यार्थ्याने रक्षाबंधन हा सण कसा पवित्र व प्रेमाचा आहे हे सांगून सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर विद्यालयाचे सृष्टी कांबळे व वृषाली कुदळे यांनी विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे, उपप्राचार्य डी.व्ही बडे, वरिष्ठ अध्यापक एस.डी. खोब्रागडे यांना राख्या बांधण्यात आल्या. त्यानंतर शाळेतील अध्ययन करत असलेले सखे भाऊ-बहीण यांना प्रथम राख्या बांधण्यात आली. त्यानंतर सहावी ते बारावीपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना राख्या बांधून मिठाई भरविण्यात आली. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सुनिता वाघमारे व हरी जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.



### बालाजी केमिकल्सकडून बावची विद्यालयाला २० बेंच भेट

**परंडा, दि.९ ऑगस्ट -**
बालाजी स्पेशालिटी केमिकल्सच्या सीएसआर निधीतून धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील २५ शाळांना साहित्य वाटप करण्यात आले. ५ जुलै रोजी झालेल्या कार्यक्रमात व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांच्या हस्ते १९ शाळांना ३०० बेंच, ५ शाळांना स्मार्ट टीव्ही व ६ शाळांना संगणक देण्यात आले. बावची विद्यालयाला २० बेंच भेट देण्यात आली. यावेळी रेड्डी यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अधिकारी, उद्योजक व आदर्श शिक्षक होण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार संस्थापक अध्यक्ष बिभीषण रोडगे व मुख्याध्यापक नारायण खैरे यांनी मानले.

### स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाच्या कळंब तालुकाध्यक्षपदी समीर मुल्ला


**कळंब, दि.९ ऑगस्ट -**
येथील पत्रकार ॲड. समीर मुल्ला यांची स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य)) कळंब तालुकाध्यक्ष पदी स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य) संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.एस. लोखंडे-पाटील यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्तीपत्र देण्यात आले असून त्यांच्या कार्यक्षमता, प्रामाणिकपणा व सामाजिक बांधिलकीचा विचार करून ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.





### भाजपा महिला आघाडीकडून पोलीस बांधवांना राखी

**वाशी, दि.९ ऑगस्ट -**
राखी पौर्णिमेनिमित्त भारतीय जनता पार्टी महिला आघाडी वाशी तालुक्याच्या वतीने आज एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. वाशी पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस बांधवांना राखी बांधून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमात महिला तालुकाध्यक्ष त्रिशाला देशमुख, विजय गायकवाड, भाजपा तालुका उपाध्यक्ष पुष्पा पोरे, 'बेटी बचाव, बेटी पढाव' अभियानाच्या तालुका प्रमुख उज्वला पाटील, रेश्मा डोरले यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.



### अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने मोफत १२० ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाटप

**तुळजापूर, दि.९ ऑगस्ट -**
धारूर रत्न तथा छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त अरुण पवार व लोकनियुक्त सरपंच बालाजी पवार यांच्या वतीने धारूर येथे चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाटप करण्यात आले. धारूर येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम सप्ताह पार पडला. हभप. रघुनाथ साळुंके महाराज बावी यांच्या मार्गदर्शनाखाली व्यासपीठ चालक सोमनाथ जाधव महाराज यांनी काम पाहिले.

# निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या ११३ कोटींच्या दुरुस्ती कामाचा शुभारंभ

### जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या हस्ते सोमवारी भूमिपूजन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ ऑगस्ट -**
लोहारा आणि औसा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी ठरणाऱ्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या तब्बल ११३ कोटी रुपयांच्या दुरुस्ती कामाचा शुभारंभ सोमवार, दि. ११ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कामामुळे २३ गावांचा परिसर ओलिताखाली येणार असून, यासाठी सलग तीन वर्षांच्या पाठपुराव्यानंतर निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती 'मित्र' संघटनेचे उपाध्यक्ष व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

या योजनेच्या दुरुस्तीसाठी आमदार पाटील यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना भेटून विनंती केली होती. त्यानंतर जलसंपदा विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना निर्देश देऊन कार्यवाहीला गती देण्यात आली. पाच टप्प्यांची ही योजना अनेक वर्षांपासून बंद असल्याने स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकी - या तिन्ही विभागांत व्यापक दुरुस्तीची आवश्यकता होती.

तिन्ही विभागांचा समन्वय साधून एकत्रित अंदाजपत्रक तयार करणे आव्हानात्मक ठरले. मात्र अखेर ११३ कोटी ५३ लाख रुपयांच्या प्रस्तावास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली.

जलसंपदा विभागाच्या नियमानुसार दुरुस्तीसाठी एकूण तरतुदीच्या फक्त १०% निधी खर्च करता येतो. मात्र या योजनेसाठी विशेष बाब म्हणून संपूर्ण रक्कम मंजूर करण्यात आली. या निधीत ५२.५१ कोटी स्थापत्य, ४३.१७ कोटी यांत्रिकी व १७.८४ कोटी विद्युत दुरुस्तीसाठी खर्च होणार आहे.

आमदार पाटील म्हणाले, माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे उपसा सिंचनासाठी ४६.९७ दलघमी पाणी राखीव ठेवले गेले होते.

त्यांच्या भगीरथ प्रयत्नाने सुरू झालेला हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याचा संकल्प आता पूर्णत्वास जात आहे. लवकरच धाराशिव, लोहारा आणि औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शिवारात निम्न तेरणेचे पाणी खळाळणार आहे.

### उपसा सिंचनसाठी ४६.९७ दलघमी पाणी राखीव

माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे तेव्हाच आपल्या हक्काचे ४६.९७ दलघमी पाणी आरक्षित करून ठेवण्यात आलेले आहे. राज्याचे माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी मोठ्या भगीरथ प्रयत्नाने सुरू केलेला हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याची जबाबदारी आपण स्वीकारली होती. ती आता पूर्ण होत आहे. त्यामुळे धाराशिव, लोहारा आणि औसा या तालुक्यातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ होणार आहे. आपल्या मागणीनुसार महायुती सरकारने विशेष बाब म्हणून ११३ कोटी रूपयांच्या या दुरूस्ती प्रस्तावास मंजुरी दिली. पाच टप्प्यातील या योजनेत स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकी अशा तिन्ही विभागाचे काम समाविष्ट आहे. स्थापत्य विभागासाठी ५२.५१ कोटी, यांत्रिकी विभागासाठी ४३ कोटी १७ लाख आणि विद्युत विभागातील दुरुस्तीसाठी १७.८४ कोटी अशा एकूण ११३ कोटी ५३ लाख रुपयांची अभूतपूर्व तरतूद केल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री नदेवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे आभारही मानले आहेत.

## उमरग्यात नेतृत्वबदल : भोसले उपअधीक्षकपदी, सुर्यवंशींवर कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ ऑगस्ट -**
धाराशिव जिल्ह्यात पोलिस दलात मोठे फेरबदल करण्यात आले असून, शुक्रवारी पोलिस अधीक्षक शफकत आमना (भा.पो.से.) यांनी तीन पोलिस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. प्रशासकीय सोय, विनंती बदल्या आणि छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राच्या विशेष पोलिस महानिरीक्षकांच्या मान्यतेनुसार या बदल्या करण्यात आल्या आहेत.



उमरगा पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले यांची पदोन्नती होऊन धाराशिव येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या उपअधीक्षकपदी नियुक्ती झाली आहे. त्यांच्या कार्यकाळात उमरगा ठाण्याने १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत मराठवाड्यात प्रथम क्रमांक पटकावला होता.

तसेच ठाण्याचे सुशोभीकरण, वृक्षारोपण आणि स्वच्छतेच्या उपक्रमांमुळे उमरगा ठाण्याला जिल्ह्यातील सर्वात सुंदर ठाणे म्हणून मान्यता मिळाली.

भोसले यांच्या जागी आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी व पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) धाराशिव पदभार सांभाळणारे प्रल्हाद चंदरराव सुर्यवंशी यांची उमरगा पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण, जनतेचा विश्वास मिळवणे आणि भोसले यांनी निर्माण केलेल्या कार्यक्षम व आकर्षक ठाण्याची परंपरा टिकवणे ही सुर्यवंशी यांच्यासमोरील मोठी आव्हाने असतील.

## एकलव्य विद्या संकुलात रक्षाबंधन सोहळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ ऑगस्ट -**
तुळजापूर तालुक्याचे आमदार राणा दादा पाटील यांनी आज एकलव्य विद्या संकुलाला भेट देऊन वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरे केले. वस्तीगृहातील मुलींनी आमदारांना राख्या बांधल्या व या आनंददायी क्षणी आमदार पाटील यांनी विद्यार्थ्यांसोबत भोजनाचा आनंद घेतला.

कार्यक्रमात एकूण ३६४ विद्यार्थी २३२ मुले व १३२ मुली उपस्थित होते. राणा दादा पाटील यांनी शाळा व वस्तीगृहाचा परिसर पाहून विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीनजी काळे, अनिलजी काळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. एकलव्य विद्या संकुलातर्फे ॲड. जनकजी पाटील यांनी आमदारांचा सत्कार केला.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, संगिता पाचंगे, सुजाता गणवीर, फुलाजी ताटीकुंडलवार, कोंडीबा देवकर, खंडू काळे, बालाजी भांडेकर, यशवंत निंबाळकर, मयूर अंतरेड्डी आदी उपस्थित होते.

## पदविका अभियांत्रिकी प्रवेशासाठी आज संस्था स्तरावरील समुपदेशन फेरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ ऑगस्ट -**
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या २०२५-२६ प्रवेश प्रक्रियेनुसार प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील रिक्त जागांसाठी संस्था स्तरावरील समुपदेशन फेरी १० ऑगस्ट रोजी शासकीय तंत्रनिकेतन, धाराशिव येथे होणार आहे. नोंदणी सकाळी ८ ते ११ या वेळेत होईल.

११ ऑगस्ट रोजी निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर येथे शासकीय तंत्रनिकेतन धाराशिव व निवासी महिला तंत्रनिकेतन लातूर यांची क्लस्टर फेरी होईल. या फेरीसाठी केवळ CP व



NON-CP नोंदणी केलेले विद्यार्थीच पात्र आहेत.

विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्रांसह व रु. १०,७६४ इतकी रोख फी घेऊन उपस्थित राहणे आवश्यक असून त्याच दिवशी प्रवेश निश्चित करणे बंधनकारक आहे. रिक्त जागांची माहिती संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर एक दिवस आधी प्रसिद्ध केली जाईल, असे प्रवेश शासकीय तंत्रनिकेतन धाराशिव समिती प्रमुख प्रा. माने एल.एम. यांनी कळविले आहे.

## कळंब-लातूर रस्त्यावरील अपूर्ण कामांमुळे जीवितहानी

### शिवसेना आक्रमक, तीव्र आंदोलनाचा इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ ऑगस्ट -**
कळंब-लातूर रस्त्यावरील दीर्घकाळ अपूर्ण असलेल्या कामांमुळे वारंवार अपघात होऊन नागरिकांचा जीव जात असल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा गट) व स्थानिक नागरिक आक्रमक झाले आहेत. तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे तीव्र रस्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

खडकी गावाजवळील अरुंद पुलावर झालेल्या अपघातात प्रकाश महाजन व मंगेश महाजन या दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आमदार कैलास घाडगे पाटील यांनी १० मे २०२५ रोजी पोलीस अधीक्षकांना पत्र पाठवून संबंधित अभियंता व कंत्राटदारावर



सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

त्याआधीही त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना केल्या होत्या, मात्र ठोस कारवाई झालेली नाही.

अलीकडेच, करंजकल्ला गावाजवळील अरुंद वळणावर चेतावणी फलक नसल्यामुळे व्यापारी कै. रमेश होनराव यांचा मृत्यू झाला. तसेच डिकसळ पाटी, त्रिवेदी कॉम्प्लेक्स, छत्रपती संभाजीराजे चौक येथे गतिरोधक नसल्यामुळे अनेक अपघात होत आहेत.


या पार्श्वभूमीवर तालुका प्रमुख सचिन काळे, संजय मुंदडा, प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रदीप मेटे, विश्वजीत जाधव, युवासेना तालुका प्रमुख पंडित देशमुख, उपशहर प्रमुख निर्भय घुले आदींच्या स्वाक्षरीचे निवेदन प्रशासनाला देऊन रस्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## धाराशिवच्या रस्ते व पाणीपुरवठ्यासाठी ३३० कोटींचा निधी

### मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार भूमिपूजन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ ऑगस्ट -**
धाराशिव शहरातील २५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे सुधारणा काम आणि तेरणा तसेच रुईभर धरणातून वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी महायुती सरकारने तब्बल ३३० कोटी रुपयांचा ऐतिहासिक निधी मंजूर केला आहे. या कामांचे भूमिपूजन लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

नगरविकास खात्याच्या नगरोत्थान योजनेतून



शहरातील सिमेंट रस्त्यांसाठी १५४ कोटी रुपये, तर अमृत २.० योजनेतून तेरणा व रुईभर धरणातून वाढीव पाणीपुरवठ्यासाठी १८० कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत. या योजनेअंतर्गत ३० किमी पाईपलाईन, जलशुद्धीकरण केंद्र, पाण्याच्या टाक्या, २२३ किमी शहरांतर्गत पाईपलाईन आणि १२ हजार कुटुंबांना मोफत नळजोडणीचा समावेश आहे.

आमदार पाटील यांनी सांगितले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात शहरातील रस्त्यांसाठी एकही रुपया मिळाला नव्हता. मात्र, महायुती सरकारच्या माध्यमातून एवढा मोठा निधी मिळवून शहराच्या विकासाला गती मिळणार आहे. त्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्व सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे शहरवासियांच्या वतीने आभार मानले.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा संताजी चालुक्य यांच्या निवासस्थानी सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ ऑगस्ट -**
महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुरूम येथील शेतकरी मेळावा आटोपून गुरुवार, दि. ८ ऑगस्ट रोजी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांच्या उमरगा शहरातील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी चालुक्य परिवाराच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या भेटीदरम्यान ग्रामीण भागातील विविध संस्था, संघटना व ग्रामस्थांनी आपल्या विविध मागण्यांची निवेदने ना. बावनकुळे यांना सादर केली.

कार्यक्रमाला माजी मंत्री बसवराज पाटील, संजय कोडगे, गुलचंद व्यवहारे, इंद्रजीत देवकते, सुनील माने, दिलीप भालेराव, सयाजी पाटील, नितीन होळे, संजय चालुक्य, किरण पाटील, ॲड. अनिल काळे, कैलास शिंदे, सिद्धेश्वर माने, हंसराज गायकवाड, गोविंद पवार, अरुण इंगवे, उमेश स्वामी, प्रशांत काळे, नेताजी शिंदे, ॲड. प्रवीण तोतला, ॲड. मोहन कोथिंबिरे, ॲड. साईराज टाचले, डॉ. उदय मोरे, डॉ. अनंत मुगळे, मनीष माणिकवार, मनीष सोनी, अनिल बिराजदार, मेघराज बरबडे, सतीश सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## लोटस पोदार लर्न स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त इंटर हाऊस स्पर्धांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ ऑगस्ट -**
नळदुर्ग येथील लोटस पोदार लर्न स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विविध शालेय इंटर हाऊस स्पर्धांच्या भव्य उद्घाटन सोहळ्याचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या सोहळ्यास विद्यार्थी, पालक, शिक्षकवर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मंत्रोच्चार आणि सरस्वती प्रतिमेच्या पूजनाने झाली. पूजनाचा मान शाळेच्या प्राचार्या रेवती शिंदे मगर यांना लाभला. दीपप्रज्वलन सोहळा शाळेचे व्यवस्थापक योगेश सूर्यवंशी, मदन इगवे, देव मंगरुळे, महेश कोरे आणि



मनोज कुलकर्णी यांच्या शुभहस्ते पार पडला.

या कार्यक्रमात शाळेतील विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांची रुपरेषा जाहीर करण्यात आली. गणवेशात सज्ज विद्यार्थी स्पर्धांच्या प्रारंभासाठी उत्सुकतेने वाट पाहत होते. उद्घाटन सोहळ्याने आगामी स्वातंत्र्य दिन साजरीकरणाचा उत्साह आणखी वाढवला.

www.tarunbharat.net
रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५
तरुण भारत
छोटे उस्ताद



- सेमीकंडक्टर चिप्स म्हणजे मोबाईलपासून ते गाड्यांपर्यंत प्रत्येक यंत्रणेचा मेंदू ! भारताने वर्ष २०२१ मध्ये भारतीय सेमीकंडक्टर मिशनची सुरुवात केली. सेमीकॉन इंडिया या ७६ हजार कोटी रुपयांच्या खर्चातून आकाराला आलेल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशात चिप डिझाईन, उत्पादन आणि संशोधनासाठी नवी सुरुवात झाली आहे. आतापर्यंत २३ कंपन्यांना या योजनेंतर्गत निधी मंजूर झाला आहे.

## अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

# काळ्या मानेचा क्रेन



प्रा मुख्याने तिबेटच्या पठारावर आढळून येणारा आणि हिवाळ्यात मात्र भारतासह नेपाळात स्थलांतरित होणारा पक्षिजगतातील एक दुर्मिळ प्रजाती असलेला काळ्या मानेचा क्रेन आपली ओळख राखून आहे. हा पक्षी मध्यम आकाराचा, राखाडी-पांढऱ्या रंगाचे शरीर असून मान व डोके काळे असते. लडाखचा राज्य पक्षी म्हणून मान्यता मिळालेल्या क्रेनच्या डोक्यावरचा भाग लाल असून डोळ्याच्या मागील बाजूस पांढरा ठिपका दिसतो. हा पक्षी साधारणपणे कुरण, तलाव-नदीकाठची दलदल आणि नदीच्या खोऱ्यात राहतो. हिवाळ्यात सहसा कमी उंचीवर आपले घरटे बांधून राहतात. नेपाळमध्ये भटकंती करणाऱ्या पक्ष्यांमध्ये या दुर्मिळ अशा काळ्या मानेच्या क्रेनची नोंद झाली आहे. एका अभ्यासानुसार, या पक्ष्यांची संख्या गेल्या वर्षीपर्यंत सुमारे चार हजार होती. बहुतेक पक्षी तिबेटमध्ये नद्यांच्या खोऱ्यात थंडीच्या दिवसात मोठ्या प्रमाणात आढळून येत. आपल्या अरुणाचल प्रदेशात हिवाळी ऋतूमध्ये काळ्या मानेचा क्रेन कमी संख्येने आढळतो. जमिनीवर विहार करून ते चारा शोधून उदरनिर्वाह करतात. चारा शोधत अक्षरशः ते दिवसातून अनेक किलोमीटर अंतर चालतात. वनस्पतींची मुळे, गांडुळ, कीटक, बेडूक इत्यादी त्यांचे आवडीचे खाद्य आहे. काळ्या मानेचा क्रेन नेहमीच सावध असतात. काही भागात त्यांना स्थानिक लोकांची सवय होऊन जाते. शत्रूचा धोका वाटताच उडून सुरक्षित स्थळी जातात. या पक्ष्याच्या १०० पेक्षा जास्त प्रजाती प्रजननासाठी भारतात येतात. कोणत्याही संरचनेशिवाय थेट गवतावर अंडी घालतात. मादी एक किंवा दोन अंडी घालते. पिल्ले उडण्यास सक्षम होईपर्यंत नर आणि मादी घरट्याजवळच फिरतात. काही भागात मेंढपाळांचे कुत्रे या पक्ष्यांसाठी धोकादायक ठरतात. काळ्या मानेच्या क्रेनचा अधिवास नष्ट होऊ नये म्हणून त्यांचे जतन ही काळाची गरज आहे.

**काळ्या मानेचा क्रेन हा पक्षी मध्यम आकाराचा, राखाडी-पांढऱ्या रंगाचे शरीर असून मान व डोके काळे असते. लडाखचा राज्य पक्षी म्हणून मान्यता मिळालेल्या क्रेनच्या डोक्यावरचा भाग लाल असून डोळ्याच्या मागील बाजूस पांढरा ठिपका दिसतो. नेपाळमध्ये भटकंती करणाऱ्या पक्ष्यांमध्ये या दुर्मिळ अशा काळ्या मानेच्या क्रेनची नोंद झाली आहे.**

दोस्तहो नमस्कार हा बुद्धीचा खुराक.. खास आपल्या सर्वांसाठी.

## हसतखेळत

रचनाः-सौ.सुरेखा विजय काणे ९९६००५३५२१

### WORD JAGAT (३)

वर: सवय | डावीकडे: मानव | उजवीकडे: तेथे | खाली: मज्जातंतु

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | WORD JAGAT (३) | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

—ःसुचनाः-
या चौकोनात पाच अक्षरी इंग्रजी शब्द लिहा. आडव्या व उभ्या शब्दांचा समानार्थी अर्थ बाहेरच्या चौकोटीत लिहिला आहे. चौकोनातील अक्षरांपासून तीन अक्षरी शब्द बनवा.
किमानः-पाच कमालः-कितीही

### अंकजगत (3)

वर: =15 | डावीकडे: =15 | उजवीकडे: =15 | खाली: = 15

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | | 3 | | 3 |
| | अंकजगत (3) | | | |
| 8 | | | | 7 |
| | | | | |
| 33 | | 11 | | 5 |

—ःसुचनाः-
प्रत्येक आडव्या व उभ्या रांगेतील पदावलीचे उत्तर ( 15 )आहे. त्यासाठी पांढऱ्या चौकोनात योग्य चिन्हांची निवड करा.

### शब्दजगत (३)

वर: वरखाली,क्षय व वृद्धी | डावीकडे: मोहक,चटपटीत | उजवीकडे: रसदार Juicy | खाली: Bloody-----क्रांती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | शब्दजगत (३) | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

—ःसुचनाः-
या चौकोनात पाच अक्षरी मराठी शब्द लिहा. आडव्या व उभ्या शब्दांचा समानार्थी अर्थ बाहेरच्या चौकोटीत लिहिला आहे. चौकोनातील अक्षरांपासून तीन अक्षरी शब्द बनवा.
किमानः-पाच कमालः-कितीही

**WORD WORLD (3)चे उत्तर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| H | A | B | I | T |
| U | | | | H |
| M | | | | E |
| A | | | | R |
| N | E | R | V | E |

RAT,HEN,VAN,HUT,NET

**अंक-जगत (3) चे उत्तर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | × | 3 | - | 3 |
| × | | | | + |
| 8 | | | | 7 |
| – | | | | + |
| 33 | ÷ | 11 | × | 5 |

उत्तर 15आहे


**शब्द-जगत (३) चे उत्तर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| च | ढ | उ | ता | र |
| ट | | | | स |
| क | | | | र |
| दा | | | | शी |
| र | क्त | रं | जी | त |

करंजी,उदार,सतार,सरशी,चटक

## देशोदेशीच्या लोककथा

प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२



# ब्युटी आणि राक्षस

**भाग ६**

न्युझिलॅण्ड मधल्या एका खेड्यात ऑलिव्हर नावाचा व्यापारी होता. त्याची अनेक जहाजे होती. वेगवेगळ्या बंदरांवर माल विकून प्रचंड नफा तो कमवत असे. त्याला तीन सुंदर मुली होत्या. इस्ला, आरोहा आणि माईया अशी त्यांची नावे होती. आरोहा आणि माईया आढ्यताखोर, उर्मट आणि स्वार्थी होत्या तर धाकटी इस्ला प्रेमळ, सर्वांचा आदर करणारी आणि दुसऱ्याला मदत करायला सदैव तत्पर होती.

'ऐका, मुलींनो, आपलं जहाज उद्या इथून निघणार आहे. त्याच्यावर माल चढवणारे बरेच नोकर चाकर येणार आहेत. त्यांना आपल्या घरी जेवायला बोलावलं तर तुम्हाला त्रास होईल का?' ऑलिव्हरनं मुलींना विचारलं. 'शी! असल्या दरिद्री लोकांना कशाला आपल्याकडे जेवायला बोलवायचं? आपली हवेली खराब होईल नं!' आरोहा म्हणाली.

'नाहीतर काय, त्यांना मेहनताना देत आहोत नं? जेवण बिवण द्यायची काही गरज नाही, आणि जर तुम्ही त्यांना आपल्या घरी जेवायला बोलावलंत तर, आम्ही आमच्या दालनातून बाहेर पाऊल टाकणार नाही,' माईया म्हणाली.

'बाबा, खुशाल बोलवा तुम्ही त्यांना जेवायला! मी त्यांच्यासाठी पक्वान्नं बनवून घेईन, त्यांचा आदरसत्कार करेन. त्यांच्यामुळे तर आपला माल जहाजावर चढतोय नं?' इस्लानं हसत हसत सांगितलं. ठरल्याप्रमाणे जहाजावर सर्व माल चढवून झाल्यावर सारे मजूर ऑलिव्हरच्या हवेलीत जेवायला आले. इस्लाने त्यांची खूप छान बडदास्त ठेवली. सारे मजूर आनंदले. सर्वांनी इस्लाला तोंड भरून आशिर्वाद दिले.'इस्ला तू ज्या घरात जाशील, त्या घराला सुख, शांती, आनंद देशील,' इस्लाच्या बाबांनी तिच्या डोक्यावरून हात फिरवत म्हटलं.

आरोहा आणि माईयाला, इस्ल, बाबा, मजूर, त्यांच्या व्यवसायाशी काहीही सोयरसुतक नव्हतं. आपण बरं अन् आपली चैन बरी, अशी त्यांची वृत्ती होती. ऑलिव्हरचं जहाज बंदर सोडून पुढे निघालं. मात्र, अचानक समुद्रातल्या वादळात सापडून बुडलं. ऑलिव्हरचं प्रचंड नुकसान झालं. तो डोक्याला हात लावून बसला. 'मुलींनो, आपलं खुप नुकसान झालंय. आता तुमचे श्रीमंती थाट बंद! घरात नोकर चाकर ठेवता येणार नाहीत आता! स्वयंपाकी, माळी... कोणीच राहणार नाहीत. तुम्हाला तिघींना कामं करावी लागतील,' त्यानं सांगितलं.'बाबा नाही SS आम्हाला नाही जमणार,' आरोहा किंचाळली. 'आम्ही कुठलंही काम करणार नाही.' माईया ओरडली. 'बाबा SS मी सांभाळेन सगळं. तुम्ही काही काळजी करू नका. मी सारी कामं आवडीनं करेन,' इस्ला हसत हसत म्हणाली.

काही दिवस गेले आणि ऑलिव्हरला कोणीतरी सांगितलं, त्याचं जहाज, जे तुटलं होतं, बुडलं होतं, ते बंदराच्या जवळ सापडलं आहे. ऑलिव्हरला आनंद झाला.

'मुलींनो, आनंदाची बातमी आहे. आपलं जहाज सापडलं आहे. मी जाऊन बघून येतो.

ऑलिव्हर घोड्यावर बसून बंदरावर गेला. तिथे एका खोबणीत जहाज अडकलेलं दिसलं. मात्र जहाजावर सारा माल, चाचे लोकांनी लुटून नेला होता. ऑलिव्हर निराश झाला. इथे थांबण्यात काही अर्थ नाही, असा विचार करून तो घरी निघाला. तो खचला होता, थकला होता. अचानक तिथे एक सुंदर राजमहल, भोवती फुलांचे ताटवे, सुंदर बगिचा, कारंजी, पक्षी दिसले. त्याला आनंद झाला. त्यानं घोड्याला, आवारात बांधलं. आत मोठ्या दिवाणखान्यात साऱ्या गोष्टी व्यवस्थित मांडून ठेवल्या होत्या.

'कोणी आहे का महालात? मी अनोळखी पाहुणा आलो आहे.' ऑलिव्हरनं विचारलं. पण काहीच उत्तर मिळालं नाही. राजेशाही भोजनव्यवस्था दिसल्यावर ऑलिव्हर यथेच्छ जेवला. महालात कोणी दिसते का म्हणून इकडे तिकडे शोधताना, त्याला शयनकक्ष दिसले. शाही पलंग आणि मऊ बिछाना त्याला दिसला. ऑलिव्हरने पलंगावर अंग टाकले. थकल्यामुळे त्याला गाढ झोप लागली. सकाळी जाग आल्यावर, शाही नाश्त्याची तयारी दिसली. त्याने भरपेट नाश्ता केला. आपल्या घरी जाण्यासाठी वळल्यावर त्याला आठवलं, घरून निघताना आपण तिघींना, तुमच्यासाठी काय काय भेटवस्तू आणू म्हणून विचारलं होते. मोठ्या दोघींनी दागिने-कपडे आणायला सांगितले होते. याउलट, इस्लाने लाल गुलाब आणायला सांगितले हेते. राजमहालाच्या बाहेर लाल गुलाबाचे ताटवे त्याला दिसले.

ऑलिव्हरने टपोरा लाल गुलाब खुडला आणि अचानक कुठून कसा, एक अक्राळिवक्राळ राक्षस त्याच्या मागे उभा राहिला.'काय चाललंय? कोणाला विचारून राजमहालातून फुले चोरलीत?''माफ करा मला! मला तीन सुंदर मुली आहेत. त्यांच्यासाठी रेड रोजेस घेण्यासाठी कोणी परवानगी देताना खळखळ करेल, अशी कल्पनाच केली नव्हती. तुम्ही इतके दयाळू आहात. माझ्यासाठी मिष्ठान्नाची, शाही पलंगाची जी सोय केली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. एवढंच नाही तर, माझ्या या अरबी घोड्यालासुद्धा त्याचा खुराक खाऊ घातलात. ठीक आहे. मी निघतो.'

'माझी एक अट आहे. ती मान्य केलीस तरच तू इथून जाऊ शकशील.' राक्षस म्हणाला.

'कोणती अट?' ऑलिव्हरनं विचारलं. 'तू तुझ्या तीन मुलींपैकी एका मुलीनं, माझ्या राजमहात रहायला यायचं.' अक्राळिवक्राळ राक्षस म्हणाला. ऑलिव्हर जरासा विचारात पडला. 'हो चालेल. मान्य आहे मला. आता तरी मला जाऊ दे.' तो म्हणाला.

ऑलिव्हर घोड्यावर बसून घरी परतला. तीनही मुली त्याची वाट पहात होत्या. 'बाबा, माझा मोती लावलेला पोषाख?' आरोहानं विचारलं. 'माझे हिऱ्यामाणकांचे दागिने?' माईयानं विचारलं. 'क्षमा करा मुलींनो, मला काहीच द्रव्य मिळालं नाही. मी नाही आणू शकलो. फक्त इस्लासाठी, हा टपोरा लाल गुलाब आणला आहे. घे बाळा.' 'धन्यवाद बाबा! तुम्ही कसे आहात? खुप दमला असाल नं? आधी पाणी घ्या.' इस्लानं गुलाब हातात घेत बाबांना पाणी दिलं.

ऑलिव्हरनं राक्षस आणि त्याच्या अटीबद्दल सांगितलं.'मी जाते बाबा, तुम्ही चिंता करू नका.' इस्ला म्हणाली. ती राक्षसाच्या राजमहालात पोहचली. राजमहाल, तिथल्या सुखसोयी, वैभव, समृद्धी पाहून ती थक्क झाली, मात्र राक्षसाला पाहिल्यावर तिला त्याची भीती वाटली. 'घाबरू नकोस. मी काही इजा करणार नाही तुला. शिक्षाही करणार नाही. तू इथे आरामात राहू शकतेस. तुझं नाव काहीही असो. मी तुला 'ब्युटी'च म्हणणार. कारण तू एखाद्या अप्सरेसारखी सुंदर आहेस.' राक्षसाच्या शब्दांनी इस्लाला थोडा दिलासा मिळाला. ती मोकळेपणी महालात वावरू लागली. थोडे दिवस गेले. हळूहळू इस्ला तिथे रूळली. तो राक्षस अधूनमधून दिसत होता. पण, इस्ला त्याला घाबरेनाशी झाली.

'मी तुला आवडतो का? तू माझ्याषी लग्न करशील का?'

'नाही, नाही, नाही... मी तुझ्याशी लग्न करणार नाही.' इस्ला निक्षून म्हणत असे.

'मला, माझ्या बाबांची खूप आठवण येत आहे. मला त्यांच्याकडे जाऊ दे.'

राक्षसानं इस्लाला एक अंगठी दिली. 'तू तुझ्या दालनात जाऊन झोप. झोपताना तू ही अंगठी घाल. उठल्यावर तू तुझ्या बाबांच्या घरी असशील. मात्र लक्षात ठेव, तुला एका आठवड्याची परवानगी देत आहे. तुझ्याबरोबर सोन्याने भरलेल्या या थैल्या देत आहे. एक आठवड्यानंतर जर तू आली नाहीस तर मी मरून जाईन. तुझं द्रव्य नाहीसं होईल. जा आता.'

इस्लानं झोपताना अंगठी बोटात घातली. डोळे उघडले तर ती बाबांच्या हवेलीत होती. तिला आनंद झाला. तिनं आणलेल्या सोन्याच्या थैल्या पाहून तिच्या बहिणींना खुप आनंद झाला. त्या तिच्याशी चांगल्या वागू लागल्या. एक आठवडा होऊन गेला. इस्ला आपलं वचन विसरली. रात्री झोपेत तिला राक्षस मरून पडलेला दिसला. तिनं ताबडतोब बोटातली आंगठी काढली, तत्क्षणी ती राक्षसाच्या राजमहालात पोहचली. राक्षस खरोखर मृतावस्थेत होता. इस्लाला पश्चात्ताप झाला. नीट पाहिल्यावर तिच्या लक्षात आलं की, राक्षसात शेवटची धुगधुगी उरली होती. इस्लानं त्याला प्रथमोपचार द्यायला सुरूवात केली. राक्षस ताजातवाना झाला. इस्लाला आनंद झाला. तिला त्याच्याबद्दल माया वाटू लागली होती. त्याचा अक्राळिवक्राळ देह सोडला तर, त्याच्यात काहीच कमी नव्हतं.

'तू माझ्याषी लग्न करषील? मी तुला आवडतो का?' राक्षसानं विचारलं. यावेळी इस्लानं होकार दिला आणि आश्चर्य म्हणजे, राक्षसाचं रूपांतर एका देखण्या राजपुत्रात झालं.

'तुझ्यामुळे मी शापमुक्त झालो. एका चेटकीणीनं मला शाप दिला होता.' राजपुत्र म्हणाला. इस्लाचे बाबा आणि बहिणी राजमहालात पोहोचले. इस्लाचा राजपुत्राशी थाटामाटात विवाह झाला. सारं मंगल मंगल झालं.

## वारसा

प्रवीण अविनाश योगी/+९१ ७५०७४ ९३११२

# किल्ले लोहगड



लोहगड हा नावाप्रमाणेच शिवछत्रपतींनी निर्मिलेल्या स्वराज्याचा एक पोलादी आधारस्तंभ! ऐन मावळात असला तरीही पुणे-मुंबई हायवेवर तसेच मळवली रेल्वे स्टेशन चार किलोमीटरवर असल्याने सहज भेट देण्यासारखा. पुण्याहून मुंबईकडे जाताना मळवलीच्या बाजूस डाव्या हाताला लोहगड-विसापूर हे आवळे जावळे दुर्ग वसले आहेत. हिंदुस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावरची कल्याण आणि सोपारा ही प्राचीन बंदरे! या बंदरांवरून होणारा व्यापार हा जुन्नर आणि पैठण या संपन्न बाजारपेठांशी संलग्न होता. त्यांना साधणारे व्यापारी मार्ग नाणेघाट व बोरघाटातून जायचे. जीवधन व भैरवगड हे नाणेघाटाची राखण करीत होते तर राजमाची अन् लोहगड हे बोरघाटाचे पहारेकरी!

लोहगडाच्या डोंगरात भाजे व बेडसा ही लेणी आहेत. इसवी सन पूर्व दुसरे शतक हा यांचा कालखंड आहे. सातवाहन राजवटीचा हा कालखंड! ऐतिहासिक साधनांच्या अभावी या प्राचीन दुर्गाचा सलग इतिहास ज्ञात नाही. परंतु हे बलदंड स्थान सातवाहन काळात अस्तित्वात होते, याबद्दल शंका नाही. पुढे बाहमनी राजांचा अंमल या प्रदेशावर होता. बाहमनी राज्याचे तुकडे झाल्यावर इ.स. १४९१ मध्ये निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमद याने या किल्ल्याचा ताबा घेतला. निजामशाहीचा डोलारा कोसळल्यावर लोहगडाचा ताबा इ.स. १६३७ मध्ये आदिलशाहीकडे गेला. इ.स. १६४८ च्या आसपास शिवाजी महाराजांनी कल्याणची लूट केली आणि त्या धामधुमीतच तुंग, तिकोना, श्रीवर्धन आणि मनरंजन तसेच लोहगड या दुर्गम दुर्गाचाही ताबा घेतला. पुढे सुरतेची लूट सुरक्षित ठेवायला ह्याच बलदंड दुर्गाची त्यांनी निवड केली. नंतर, केवळ राजकीय तडजोड म्हणून मिर्झाराजे जयसिंहाशी केलेल्या तहात जे २३ किल्ले शिवाजीराजांनी मोगलांच्या हवाली केले त्यांत हा एक होता. परंतु नंतर अवघ्या पाच वर्षांत इ.स. १६७० मध्ये त्यांनी हा पुन्हा जिंकून घेतला. शिवरायांच्या निधनानंतर औरंगजेबाच्या वावटळीत हा परत मुघलांकडे गेला. इ.स.१७१३ च्या सुमारास सरखेल कान्होजी आंग्रे यांनी तो पुन्हा स्वराज्यात आणला.

लोहगड हा मुंबई आणि पुण्याच्या जवळ असल्यामुळे तो ट्रेकर्स आणि इतिहास प्रेमींसाठी एक सहजसाध्य गड आहे. रस्ता, रेल्वे आणि विमानमार्गाने या किल्ल्यापर्यंत सहज पोहोचता येते. रस्त्याने जाणाऱ्यांसाठी लोहगड मुंबईपासून सुमारे १०० किलोमीटर आणि पुण्यापासून ६० किलोमीटरवर आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेने लोणावळ्यापर्यंत जाता येते. तेथून मळवली गाव गाठले की, किल्ल्याचा ट्रेक सुरू होतो. पुण्याहून लोणावळा किंवा मळवलीसाठी एसटी बसेस आणि खासगी वाहने सहज उपलब्ध असतात. लोणावळ्याहून ऑटो-रिक्शा किंवा खासगी टॅक्सीने मळवली किंवा भाजे गावापर्यंत जाता येते, त्यामुळे ट्रेकिंगचे अंतर थोडे कमी होते. रेल्वे मार्गाने प्रवास करणाऱ्यांसाठी मळवली हे जवळचे स्थानक आहे, जे किल्ल्यापासून अवघ्या ४ किलोमीटरवर आहे. लोणावळा हे मुंबई-पुणे मार्गावरील महत्त्वाचे रेल्वे स्थानक असून तेथून मळवलीसाठी लोकल ट्रेन किंवा टॅक्सीने जाता येते.

ज्यांना अधिक सुलभ मार्ग हवा आहे, त्यांच्यासाठी लोहगडवाडी गावापर्यंत मोटार रस्ता आहे. या रस्त्यामुळे वर्षभर किल्ल्यावर सहज जाता येते. पावसाळ्यात इथे धुक्याची दुलई पसरलेली असते तर, हिवाळ्यात थंड हवामान आणि निळ्याशार आकाशामुळे निसर्ग अधिक खुलून दिसतो. हा ट्रेक फक्त गिर्यारोहकांसाठीच नव्हे तर, कुटुंबांसह फिरायला जाणाऱ्या पर्यटकांसाठीही एक उत्तम अनुभव ठरतो.

लोहगड किल्ल्याची वास्तुकला त्याच्या भक्कम लष्करी बांधणी आणि कलात्मक शिल्पकलेत दिसून येते. किल्ल्यावर चार भव्य दरवाजे आहेत. गणेश दरवाजा, नारायण दरवाजा, हनुमान दरवाजा आणि महा दरवाजा! हे दरवाजे केवळ प्रवेशद्वार नसून इतिहासाच्या गौरवशाली लढायांचे साक्षीदार आहेत. त्यावरील नक्षीकाम, मजबूत दगडी बांधकाम आणि अप्रतिम स्थापत्यकलेतून तत्कालीन अभियंत्यांची कुशलता दिसून येते. आजही हे दरवाजे मोठ्या प्रमाणात सुस्थितीत असून, इतिहासाच्या जुन्या आठवणी जागृत करतात.

लोहगडाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कड्याच्या टोकावर बांधलेली चिरेबंदी वाट! अशी रेखीव वाट फार कमी दुर्गांवर पहावयास मिळते. लोहगडवाडी पार केली की, ही नागमोडी वाट सुरू होते. एकदा का कोणी या वाटेवर पाय टाकला की, मग तो माणूस वर येईस्तो पहारेकऱ्यांच्या नजरेआड जात नाही. तो व्यवस्थित हेरला जातो. वाटेवर वेगवेगळे बुरूज आहेत. त्यावरून बाहेरून येणाऱ्या माणसावर नजर ठेवता येते. लोहगडचा सर्वात नेत्रदीपक भाग म्हणजे 'विंचूकडा'. हा अरुंद आणि उंच सुळका किल्ल्याच्या मुख्य भागातून पुढे गेलेला असून, त्याचा आकार विंचवाच्या नांगीसारखा दिसतो. नैसर्गिकरित्या घडलेली ही भौगोलिक रचना संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची होती. येथून दिसणारा सह्याद्रीचा नजारा डोळ्यांचे पारणे फेडतो. विंचूकडावर जाण्याचा ट्रेक थरारक असून, गिर्यारोहक आणि छायाचित्रकारांसाठी हा नंदनवनासारखा आहे.

लोहगडच्या बांधणीतील ताकद आणि सौंदर्य एकत्रितपणे त्याला दुर्गशास्त्रातील अप्रतिम नमुना बनवतात. या किल्ल्याचे दरवाजे, बुरुज, गुहेतील शिलालेख आणि विस्तीर्ण तटबंदी हे शिवकाळापासूनच्या स्वाभिमानी इतिहासाची अभिमानाने साक्ष देतात.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भाविकांच्या ऑटोला पीकअप वाहनाची धडक; एक ठार,पाच गंभीर

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ९ ऑगस्ट -**

नारळी पौर्णिमेला रक्षाबंधनाच्या दिवशी माहूरगडावर देवदर्शनासाठी आलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथील भाविकांच्या तीनचाकी ऑटोची व मालवाहू पिकअप वाहनाची जोरदार धडक होऊन झालेल्या भिषण अपघातात एक ठार तर पाच जण गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना दि.०९रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास पुसद रोडवरील उखळी घाटात घडली.ऐण रक्षाबंधनाच्या सणाच्या दिवशी ही दुर्दैवी अपघाताची घटना घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

माहूरगडावर सुरू असलेल्या परिक्रमा यात्रेत दिग्रस जिल्हा यवतमाळ येथील भाविक विजय पंजाब थोरात (२५),अर्जुन प्रकाश हुडे (३०), सुनिल महादेव शिंदे (३०), युवराज संजय शेंडे (२२), राजेश सुभाष राठोड (४०) व संतोष सिताराम गादेकर (४५) हे सहा जण प्रवास करीत असलेल्या ऑटोस समोरून येणाऱ्या पिकअप क्रमांक. एमएच २६ ए डी ६३४० जोरदार धडक दिली. यात ऑटोतील सहाही जणांना गंभीर दुखापत झाली. सर्व गंभीर जखमींना १०८ रुग्णवाहीकेद्वारे माहूरच्या शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अधिक्षक डॉ. किरणकुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विपिन बाभळे,डॉ.अभिजित अंबेकर, नर्सिंग अधिकारी दता पालटवार, मुधोळकर,मिना शिवशेटी यांनी प्रथमोपचार करून या अपघातातील गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णवाहीके द्वारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ येथे संदर्भित करण्यात आले. यापैकी अत्यवस्थ अवस्थेत असलेल्या अर्जुन हुडे वय ३० याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे कळाले.

सध्या माहूरगड येथील श्री दत्तात्रेय शिखर संस्थान दत्तात्रेय मंदिर येथे सुरू असलेल्या नारळी पौर्णिमा यात्रे दरम्यान अपघाताची मालिका बघायला मिळत असून, किरकोळ व मोठ्या अपघाताचे डझनांवर रुग्णांनावर माहूर ग्रामीण रुग्णालयात उपचार केल्याची दफ्तरी नोंद आहे.

# आ. बोंढारकर याच्या प्रयत्नाने नांदेड मध्ये लवकरच धावणार शहर बस



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ ऑगस्ट -**

नांदेड शहरातील अंतर्गत प्रवासासाठी शहर बस सेवा पुन्हा सुरू करण्याच्या अनुषंगाने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतली. या भेटीत सकारात्मक चर्चा झाल्याचे आ. बोंढारकर यांनी सांगितले असून लवकरच नांदेड शहरात पुन्हा एकदा शहर वाहतूक बस धावेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नांदेड शहराचा वाढता विस्तार आणि प्रवाशांची संख्या लक्षात घेता शहरात शहर बस सेवा असणे अत्यावश्यक झाले आहे. खाजगी आटोतून प्रवास करताना प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो आहे. शिवाय रिक्षा चालकांची मनमानी आणि उद्धटपण यामुळे होणारे वाद लक्षात घेता नांदेडमध्ये शहर बस सेवा सुरू व्हावी यासाठी आ. बोंढारकर यांचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय नांदेड शहरातील अनेक शासकीय कार्यालय हे सध्या शहराबाहेर स्थलांतरित होत आहेत. न्यायालय नव्या वास्तूत म्हणजे कौठा परिसरात येत्या काही महिन्यांमध्ये स्थलांतरित होईल. विष्णुपुरी येथील रुग्णालय , विद्यापीठ, आरटीओ कार्यालय असे अनेक महत्त्वाचे कार्यालय शहराबाहेर आहेत. त्यामुळे कामानिमित्त या ठिकाणी प्रवास करणाऱ्या नागरिकांना आर्थिक भार सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता राज्य परिवहन महामंडळाची शहर बस सुरू करावी यासाठी आ. बोंढारकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री ना.प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन मागण्याचे निवेदन दिले . या भेटीत उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री सरनाईकयांनी सकारात्मक चर्चा केली असून लवकरच नांदेडमध्ये शहर बेस सुरू करण्याच्या अनुषंगाने संबंधितांना सूचित करण्यात येईल अशी माहिती त्यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त

### उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी मेंगशेट्टी यांचा गौरव



**भोकर**-येथे उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले प्रविण मेंगशेट्टी यांनी त्यांच्या कार्यकाळात उत्कृष्ट काम केले असून त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. प्रविण मेंगशेट्टी हे नांदेड जिल्ह्यात प्रशासनाच्या विविध विभागात काम करित असताना पारदर्शक जनहिताचे कामांना प्राधान्य दिले आपत्ती व्यवस्थापन महसूल नागरीकांना सेवा देण्यासाठी दाखवलेली तत्परता कार्यक्षम हे त्यांचे काम उल्लेखनिय असून राज्यशासनाकडून प्रशासनातील उल्लेखनिय काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा दरवर्षी सन्मानपत्र देवून गौरव केला जातो यंदा भोकरचे उपजिल्हाधिकारी प्रविण मेंगशेट्टी हे आपल्या सेवाकाळात केलेले पारदर्शक सेवाभाव काम नागरीकांसमोर निर्माण झालेल्या अडचणी सोडविण्यासाठी पूढाकार घेत अनेकांचे प्रश्न सोडविले.त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्यल त्यांचा जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या हस्ते सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले.उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून सन्मान मिळाल्याबद्यल नांदेड जिल्ह्यातील सर्व अधिकारी वर्ग तसेच लोकप्रतिनिधी पत्रकार सर्वसामान्य नागरीकांकडुन अभिनंदन केले.

### नारायण शिंदे यांच्या लुटीचा ताळेबंद चे आज प्रकाशन

**नांदेड**-ज्येष्ठ लेखक, कवी नारायण शिंदे यांचा यांच्या लुटीचा ताळेबंद या काव्यसंग्रहाचे प्रकाशन उद्या दिनांक १० ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजता गणराज फंक्शन हॉल नमस्कार चौक नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे. आ. सतीश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य अकादमी प्राप्त बालकवी डॉ. सुरेश सावंत यांच्या हस्ते या काव्यसंग्रहाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी कवितेचे अभिवाचन प्रसिद्ध कवी आत्माराम राजेगोरे हे करणार आहेत तर प्रकाशन सोहळ्यानिमित्त विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या शिक्षण उपसंचालक राजेश शिंदे , ह भ प भास्करबुवा शिंदे , विजयकुमार चित्तरवाड , दिलीप धर्माधिकारी आणि दिगंबर कदम यांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. निर्मल प्रकाशनाने प्रकाशनसाठी सिद्ध केलेल्या या प्रकाशन सोहळ्यास साहित्य प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रकाशक निर्मल कुमार सूर्यवंशी आणि यशवंतराव चव्हाण विचार मंचच्या वतीने करण्यात आले आहे.

### तेली समाजातील गुणवंत पदोन्नती रुजू झालेल्या समाज बांधवांचा सन्मान

**मुदखेड**-दरवर्षी प्रमाणे याही वर्षी तेली समाजसेवा भावी संस्थान यांच्यावतीने तेली समाजातील गुणवंत विद्यार्थी नव नियुक्त अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सत्कार सोहळा तसेच रक्तदान शिबीर नुकताच नांदेड प्रतिभा निकेतन कॉलेज सभागृह बंदा घाट रोड येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. लेनिना यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल कसे वाढावे यासाठी मार्गदर्शन करून त्यांना ओम ध्वनी द्वारे आपली गुणवत्ता कशी वाढवावी यासाठी अमूल्य मार्गदर्शन केले त्यांनी विद्यार्थ्यांच्या समूहांमधील जाऊन एक वेगळेपणा जाणून विद्यार्थ्यांचा समावेश संभाषण केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विश्वस्त राम सावकार सूर्यवंशी तर प्रमुख संस्थेचे अध्यक्ष अँड बालाजीराव बनसोडे प्रमुख वक्त्या म्हणून डॉक्टर लेनिना एस व्ही बी सहाय्यक प्राध्यापिका श्री गुरु गोविंद सिंगजी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था नांदेड व सौ भावना नितीन शिक्षिका गल्फ एशियन इंग्लिश स्कूल दुबई , संस्थेचे माजी अध्यक्ष समाज भूषण शेषराव अलोने , दशरथ रावजी शिवलाड संस्थेचे सचिव लक्ष्मणराव शिरसागर, बनसोडे, निवृत्त पीएसआय अशोक बिजवे , नंदकिशोर झोळगे , नारायणराव बनसोडे , ईश्वर पिन्नलवार, सखाराम क्षिरसागर , चंद्रकांत दगडफल्ले , स्वाती आलोने यांची उपस्थित होती. कार्यक्रमाचा प्रास्ताविक तेली समाजचे जिल्हा अध्यक्ष लक्ष्मणराव क्षीरसागर यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये २६ गुणवंत विद्यार्थी पहिली चौथी पाचवी आठवी दहावी बारावी डी फॉर्म बी फार्म बीए बी कॉम एम एम कॉम बीएससी एमएससी बी टी एम टेक आयआयटी इंजीनियरिंग सर्वांचा यथोचित मोमेंटो व नगदी स्वरूपात पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. तेली समाजातील पदोन्नती मध्ये पोलीस अधिकारी म्हणून पदोन्नती अनिल गव्हाणकर , तसेच नव्याने महाराष्ट्र शासनाने नगर रचनाकार साहाय्यक पदावर शुभम साईनाथ पिन्नलवार व दुसरा स्वप्निल व्यकटपुरवार यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजीराव बनसोडे लक्ष्मणराव क्षीरसागर, शेषराव आलोने, गणेश रावजी सूर्यवंशी , महिला अध्यक्ष जिजाबाई तगडपले, शंकरराव परकंठे ,चंद्रकांत अटकळीकर , माधवराव परगेवार , घाडगे, नंदकिशोर झोळगे यांच्या सह अदी ने परिश्रम घेतले आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक बालाजी यशवंतकर यांनी केल तर आभार प्रदर्शन चंद्रकांत आटकळीकर यांनी मानले.

### श्री एकदंत गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी प्रशांत सुर्यवंशी,कोषाध्यक्ष पदी शुभम भेदे

**नरसी**-नायगाव तालुक्यातील नरसी येथे श्री एकदंत गणेश मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते श्री एकदंत गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी प्रशांत सूर्यवंशी, उपाध्यक्षपदी श्रीकांत सुर्यवंशी तर सचिव पदी श्याम पललवाड यांची निवड करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नरसी येथे प्रसिद्ध असलेल्या श्री एकदंत गणेश मंडळाची कार्यकारणी ची बैठक दि.५ ऑगस्ट रोजी श्री एकदंत नगर येथे नंदकिशोर टोकलवाड, सामाजिक कार्यकर्ते लालबा सुर्यवंशी, जेष्ठ पत्रकार गोविंद टोकलवाड नरसीकर, देवीदास सुर्यवंशी, रमाकांत सुर्यवंशी, परमेश्वर लोहगावे, शंकर टोकलवाड, शिवाजी सुर्यवंशी, सुभाष सुर्यवंशी, दिलीप टोकलवाड, दिलीप सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते पुढील प्रमाणे कार्यकारणी निवड करण्यात आली असून यात अध्यक्षपदी प्रशांत सूर्यवंशी उपाध्यक्षपदी श्रीकांत सुर्यवंशी, सचिवपदी श्याम पललवाड, कोषाध्यक्षपदी शुभम भेदे, सदस्य पदी चंद्रकांत सूर्यवंशी, क्रिष्णा नरसीकर, निवृत्ती सूर्यवंशी, अनिल भेदे, पांडुरंग निलेवार, साईनाथ सूर्यवंशी, अंतेश्वर सूर्यवंशी, देवीदास तोटरे, शंकर सुर्यवंशी, खंडू कांबळे, यशपाल सूर्यवंशी, यांची निवड करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद ; महिला पदाधिकाऱ्यांकडून रक्षाबंधन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ९ ऑगस्ट -**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत भारतीय जनता पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी रक्षाबंधनाचा सण मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा केला. या निमित्ताने किनवट पोलिस स्थानकाला भेट देऊन पोलिस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रती सन्मान व आपुलकी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमात भाजपा महिला जिल्हाध्यक्ष संध्याताई राठोड, सागर ताई शिंदे, गंगुबाई परेकार, विद्याताई पाटील, सुकेशिनी ताई कपाटे यांनी किनवट पोलिस स्थानकाचे पोलिस निरीक्षक देविदास चोपडे यांना राखी बांधून शुभेच्छा दिल्या. पोलिस बांधवांच्या सुरक्षिततेसाठी व आरोग्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी रक्षाबंधन हा फक्त भाऊबहिणींचा नव्हे, तर समाजातील सुरक्षा, बांधिलकी व परस्पर विश्वासाचा उत्सव असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी भाजपा महिला पदाधिकाऱ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करून पोलिस दलाच्या वतीने आभार मानले.

# वृक्ष लावणे काळाची गरजः उपविभागीय अधिकारी कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. ९ ऑगस्ट -**

जागतिक तापमान वाढीमुळे व तसेच हवामान बदलामुळे पृथ्वीवरील मानवाचे अस्तित्व पोक्यात आले आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहनांचा अतिवापर परिणामी निर्माण होणाऱ्या प्रदूषणामुळे शहरात श्वास घेणे ही आता कठीण होत आहे. त्यामुळे शुद्ध हवा व ऑक्सिजन पाहीजे असेल तर झाडाशिवाय दुसरा पर्यायच नाही. त्यामुळे वृक्षलागवड व त्याचे संगोपन महत्वाचे ठरते आहे. आपण सर्वांनी किमान पाच वृक्षाची लागवड करून त्याचे संगोपन केल्यास खऱ्या अवनि निसर्ग चक्रातला महत्वपुर्ण नियम आपण पाळला असा अर्थ होतो. म्हणून वृक्ष लागवड काळाची गरज आहे, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांनी केले.

मौ. सिरंजनी ता. हिमायतनगर येथे महसूल सप्ताहानिमित्त वृक्षलागवड कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपविभागीय अधिकारी कांबळे व तहसीलदार पल्लवी टेमकर, सिरंजनीचे सरपंच प्रतिनीधी पवन करेवाड यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. आपल्या मनोगतात तहसिलदार श्रीमती टेमकर म्हणाल्या की, पृथ्वीवरील बने, माती, हवा, पाणी, तसेच जैवविविधता

यासह संसाधनाचा काळजीपुर्वक वापर करणे तसेच पुढील पिढ्यांसाठी संवर्धन करणे अतिशय, गरजेचे ठरते आहे. सरपंच प्रतिनीधी पवन करेवाड यांनी प्रास्ताविक करूण शेवटी आभार मानले. यावेळी नायब तहसिलदार पंगे, पवन करेवाड, मंडळ अधिकारी चव्हाण, तलाठी पुरी, तलाठी शेख आदिंची उपस्थिती होती.

# दलित वस्ती योजना भ्रष्टाचाराच्या भोवऱ्यात? काँग्रेसने केली उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ९ ऑगस्ट -**

मुदखेड नगर परिषदेमार्फत राबविण्यात आलेल्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत २०२० ते २०२५ दरम्यान मंजूर झालेल्या विविध विकासकामांमध्ये गंभीर आर्थिक अनिय२मितता आणि अपूर्ण कामांचा आरोप होत असून, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी शहर काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष ऋषिकेश भिमराव चौदंते यांनी केली आहे.

नगर परिषदेतील तत्कालीन मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि अभियंता अनंत कुलकर्णी यांच्यावर अपयशाचा ठपका ठेवण्यात आला असून, त्यांनी संबधित ठेकेदारांशी संगनमत करून निधी खर्च करूनही बोगस व अपूर्ण कामे केल्याचा आरोप पत्रात करण्यात आला आहे. सदर कामांमध्ये रस्ते, नाल्या,



पाइपलाइन, गटारे इत्यादींचा समावेश होता. अनेक ठिकाणी ही कामे झालीच नसल्याचा ठपका देखील चौदंते यांनी ठेवला आहे.

या पार्श्वभूमीवर चौदंते यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून, तत्कालीन मुख्याधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात आर्थिक, प्रशासकीय चौकशी (ऑडिट), तसेच शिस्तभंग व गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व कामांची चौकशी, दलित समाजाच्या विकासासाठी मंजूर निधीचा अपव्यय थांबवणे, कामांची तातडीने पुन्हा अंमलबजावणी व अपूर्ण कामे पूर्ण करणे, स्वतंत्र चौकशी समितीमार्फत अहवाल जाहीर करणे, या प्रमुख मागण्या निवेदनात नमुद आहेत.

पत्रात स्पष्ट चेतावणी देण्यात आली आहे की, जर त्वरित कारवाई झाली नाही, तर दलित समाजातर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर असेल. असे निवेदनकर्त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# एक राखी सैनिकांसाठी, देशाच्या रक्षणासाठी रविंद्रनाथ टागोर शाळेत सैनिकांसोबत रक्षाबंधन

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि. ९ ऑगस्ट -**

दरवर्षी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमातून रक्षाबंधन साजरा करणाऱ्या रविंद्रनाथ टागोर प्राथमिक शाळेत यावर्षी एक राखी सैनिकांसाठी, देशाच्या संरक्षणासाठी या उपक्रमातून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला यावेळी आजी माजी सैनिक बालाजी चुकलवाड, पोचीराम वाघमारे, बापुराव कल्याणकर, गोविंदराव सुर्यवंशी,मधुकर राठोड, यांच्यासह माजी पंचायत समिती सदस्य उत्तमराव चव्हाण, पत्रकार शुभम केंद्रे, सागर डोंग्रजकर, संस्थेचे सचिव गंगाप्रसाद यन्नावार, मुख्याध्यापक एस जी मुंडे, सहशिक्षक रोहिदास सुर्यवंशी,एकनाथ तिडके, राजीव होंडाळे, तारकेश तपासे, श्रीमती शेख वाय आय,मंजुषा यन्नावार यांच्यासह विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.



यावेळी विद्यार्थ्यांनी आजी माजी सैनिकांना राखी बांधत देशाच्या रक्षणासाठी खडतर परिश्रमाबद्दल सैनिकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी आजी माजी सैनिकांच्या वतीने विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आली, शाळेच्या वतीने मान्यवरांचा तिरंगा ध्वजाची प्रतिकृती देऊन सन्मान करण्यात आला. व विद्यार्थिनी सैनिक व माजी सैनिकांना राख्या बांधल्या. यावेळी माजी सैनिक संघटनेचे जिल्हाअध्यक्ष बालाजी चुकलवाड व भारतीय सैनिक जवान मधुकर राठोड यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना रक्षाबंधनच्या शुभेच्छा दिल्या तर उत्तम चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले.

संस्थेचे सचिव गंगाप्रसाद यन्नावार यांनी प्रास्ताविकातुन शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रम व शैक्षणिक प्रगतीची माहीती दिली व उपस्थितांचे आभार मानले.

# पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ; नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा स्त्युत्य उपक्रम!

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ९ ऑगस्ट -**

आजवरचा परीक्रमा वेढ्याच्या यात्रेच्या इतिहासातील गर्दीचे सर्व उच्चांक मोडीत काढत रेकार्ड ब्रेक अशा चार ते पाच लाख भाविकांच्या अलोट गर्दीचा उसळलेला महासागर आज शनिवारी परीक्रमा परत वेढ्याच्या दुसऱ्या दिवशीही कायम होता.यातील लाखो भाविक शहरातील मठ, आश्रम ,मंदीर व शहरा बाहेरून जात असल्याने परीक्रमा मार्गावरील शहरातील दत्त चौक टी पॉइंट जवळ माहूर चे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या कडून (महाप्रसाद) ५ क्विंटल खिचडी चे वाटप करण्यात आले.

अन्नदान हे श्रेष्ठ दान मानले जाते,धर्मादायासाठी दान केलेल्या कोणत्याही वस्तू, त्या नेहमी सर्वोत्तम दर्जाच्या किंवा स्वतः वापरता त्यासारख्याच असाव्यात, कमी दर्जाच्या वस्तू दान करू नयेत, या उक्तीला साजेसे असे अडीच क्विंटल तांदळा चे मसाले भात महाप्रसाद म्हणून नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी टी पॉइंट



येथील नगर पंचायतीच्या नियंत्रण कक्षात वाटप केले.

या महाप्रसादाचा लाभ माहूर गडावर आलेल्या हजारो भाविकांनी घेतला.नगराध्यक्ष फिरोज दोसानी हे नेहमीच यात्रा उत्सव व कुठल्याही धार्मिक,सामाजिक कार्यात हिरीरीने सहभागी होत असतात. तब्बल २६ किमी ची माहूरगडच्या सह्याद्री पर्वत रांगा मधील उपदेवस्थानांची प्रदक्षिणा परीक्रमा वेढा घालून थकलेल्या भाविकांनी रुचकर चविष्ट अशा मसाले भात चा मनमुराद आनंद घेतल्याने दोन ते तीन तासातच अडीच क्विंटल च्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या वेळी उपनगराध्यक्ष नाना लाड, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) माहूर तालुका अध्यक्ष मेघराज जाधव ,अमित येवतीकर,नगर सेवक प्रतिनिधी रफीक सौदागर, आकाश कांबळे, राज ठाकूर, जगदीश वडसकर, विजय शिंदे, गणेश जाधव, जावेद दोसानी, सैफ दोसानी, संदीप गज्जलवाड, देविदास जोंधळे,विशाल मारेवाड, अनिल माडपेल्लीवार, जयकुमार अडकीने,गणेश खडसे, रफिक भाई गाईड, सदानन पुरी यांची उपस्थिती होती.

# श्री गुरु गोविंद सिंघजी अभियांत्रिकी संस्थेने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचे उद्योगांना हस्तांतरण

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ ऑगस्ट -**

महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी फायनन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन (एमएसएमइ) योजना अंतर्गत लघु व मध्यम उद्योगाच्या उत्पादनासाठी विकसित तंत्रज्ञान निर्माण करण्यासाठी सहकार्य केले्. त्यानुसार श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था येथील ६ प्राध्यापक व १० विद्यार्थी यांच्या संशोधन प्रयत्नाने नांदेड परिसरातील उद्योग कंपन्यांना लागणाऱ्या तंत्रज्ञानाच्या विकासाकरिता वरील योजना अंतर्गत नांदेड येथील औद्योगिक वसाहतीतील कंपनीतील यंत्राचा अभ्यास करून आधुनिक तंत्रज्ञान विकसित करून त्यांना पूर्वीपेक्षा कमी दराच्या खर्चात विद्यार्थ्यांनी कंपन्यांना यंत्र पुरवण्याचे संशोधन करून विकसित तंत्रज्ञान उद्योगांना हस्तांतरण करण्यात आले. यावेळी आयोगाचे डॉ. नरेंद्र शहा व दिनेश जगताप यांचे संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी आभार मानले.

नांदेड जिल्हा औद्योगिक परिसरातील



विविध कंपन्यांना आरजीएसटीसी-एमएसएमइ इंटर्नशिप कार्यक्रमांतर्गत संशोधक विद्यार्थ्यांनी विविध विभागाच्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांना कंपन्यांमध्ये इंटर्नशिपसाठी पाठविण्यात आले. या विद्यार्थ्यांनी कंपनीला येत असलेल्या येत्राच्या तांत्रिक अडचणीचा अभ्यास करून त्यावर संशोधन करून त्या संशोधनाचे निराकरण करण्याकरिता तंत्रज्ञान विकसित करण्याकरिता आरजीएसटी - एमएसएमइ या आयोगाने आर्थिक मदत केली. सदरील कंपन्यात संशोधन करण्याकरिता या विद्यार्थ्यांना संस्थेच्या विविध विभागातील प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. विकसित केलेले तंत्रज्ञान समर्थ इंजिनिअरिंग कंपनी कुष्णूर नांदेड यांना स्वयंचलित स्प्रिंग मेकिंग मशीन देण्यात आली.यावेळी उद्योग प्रतिनिधी म्हणून गजानन त्रिकुटकर हे उपस्थित होते. हे यंत्र प्रा. जीत पाटील व प्रा. सागर यांच्या मार्गदर्शनाखाली गोविंद ढगे आणि ओजस वाणी यांनी विकसित केले तर त्याचप्रमाणे रेझीन डस्ट कलेक्टर सिस्टीमची डिझाईन हे तंत्रज्ञान प्रा. दीपक वाघरे यांच्या मार्गदर्शनाखाली ऋषिकेश शिरसाट व आशिष गुजरवार यांनी विकसित केले. या तंत्रज्ञानामुळे पीव्हीसी पाईप उत्पादनात निर्माण होणाऱ्या प्रदूषणास आळा बसला. त्याचप्रमाणे तिसरे हस्तांतरित केले यावेळी मारोती मोरे हे उद्योग प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते तंत्रज्ञान गोदावरी ड्रग्स लिमिटेड करिता विकसित करण्यात आले प्रा. ए.पी. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अभिषेक पावशे व विद्याधर नागाबसव यांच्या प्रयत्नातून पूर्ण करण्यात आले. या संशोधनातून नांदेड परिसरातील वरील उद्योगांना नवीन तंत्रज्ञान हस्तांतरित करण्यात आले. उद्योजकांनी विकसित तंत्रज्ञानाचा अवलंब केला. सदरील योजनेमुळे परिसरातील उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञान विनामूल्य प्राप्त होऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण झाले्. यामुळे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना सुद्धा उद्योगाच्या प्रत्यक्ष समस्यावर काम करण्याची व निराकरण करण्याची संधी मिळाली अशा प्रकारचे तंत्रज्ञान हस्तांतरण करण्याची संधी श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड यांच्या इतिहासात प्रथमच घडली .त्यामुळे संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे आणि प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

वरील तीन तंत्रज्ञान हस्तांतरण व्यतिरिक्त या संस्थेने अर्थसाह्य दिले दोन प्रकल्प देखील यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. यामध्ये डॉ. ए. व्ही. नांदेडकर व डॉ. सिद्धांत गुढे यांनी त्यांचे मार्गदर्शन केले. तसेच संजीवनी जाधव, अनुराग कालोरकर, महादेवी बिरादार, सुधीर अग्निहोत्री, अशा एकूण दहा विद्यार्थी व सहा प्राध्यापकांनी सदरील संशोधनावर काम केले. यामुळे कंपनीतील यंत्रावर थेट संशोधन करून दुसरे यंत्र तयार करून देण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाल्याने तो विद्यार्थी कुशल अभियंता बनवून बाहेर पडतो हे संस्थेचे कौतुकास्पद कार्य आहे. यावेळी प्रबंधक डॉ. बी.आर. बोंबडे, डॉ्.ए.व्हि. नांदेडकर, डॉ. ए. बी. गोंडे, प्रा पी.जी. जाधव आणि डॉ. रोहित देशमुख, डॉ. जित पाटील, डॉ. कल्पक सागर, डॉ. दीपक वागरे, डॉ. आनंद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन प्रक्रिया पार पडली. अशी माहिती संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी दिली.